# अेकनाथा चीं भजनें

प्रस्तावना-खंडा सह

★

वीनोबा

म. ग्रं. सं. ठाणे
विषय ८३/०२१
सं. नं. ९२८५

REFBK-0007475

ग्राम-सेवा-मंडळ

वरधा

# अेकनाथांचीं भजनें

★

वीनोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
REFBK-0007475
REFBK-0007475
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

ग्राम-सेवा-मंडळ, वरधा

१९५० ]

[ मूल्य १२ आणे

प्रकाशक :

अनसूया बजाज,

मंत्री, ग्राम-सेवा-मंडळ, वर्धा

आवृत्ती दुसरी, डीसेंबर १९५०

मुद्रक :

शं. दे. पथकी,

बी. ए., एल.एल. बी.

भारत-सेवा-मुद्रणालय, वर्धा

एकनाथांचीं भजनें

# प्रस्तावना-खंड

## अनुक्रम

पृष्ठ


१ भागवत १

२ भारूड ४

३ भजनें ८

४ स्थूल चरित्र १२

५ भाव-चरित्र १४

६ जन हें ची जनार्दन २१

७ कीर्तन-भक्ती ३१

८ नाथ-पूर्व-कालीन विचार-विकास ३४

९ नाथांचे अनुवादग्रंथ ४१

१० उपासनेचें अमृत ५१


## परिशिष्ट


१ भजनांची सूची १

२ शब्दार्थ-पत्र ८

अनुक्रम ७.१०.८.८७
वीभाग
क्रमांक
नों. दि. 29/12/58

# दोन शब्द

एकनाथांच्या भजनांची ही दुसरी आवृत्ती वाचकांच्या हाती पडत आहे। पहीली आवृत्ती संपल्या नंतर मधल्यंतरी बरेच दीवस गेले। मी नीराळ्या कार्यक्रमात गुंतून राहील्यामुळे नाईलाज होता।

अभंगांच्या चींतनाला मदत मीळावी म्हणून कींचीत अवलोकन या आवृत्तीस जोडले आहे। वाचकांना त्याचा चांगला उपयोग होईल, अशी मला आशा आहे। माझी अशी ईच्छा आहे की ही आवृत्ती लवकरात-लवकर खपून जावी। म्हणजे तीसरी आवृत्ती शक्य तर पूर्ण चींतनीका जोडून प्रकाशीत करता येईल। चींतनीका लीहीण्यास मी सुरवात ही केली होती। पांच-पन्नास अभंगांची लीहून ही झाली आहे। पण, पुढे फुरसत न झाल्यामुळे गाडी तीथेच अडकून पडली आहे।

राजघाट, दील्ली
१७-११-५१

वीनोबा

# अेकनाथांचीं भजनें

## प्रस्तावना-खंड

### १. भागवत

त्या वेळी मी जेमतेम पंधरा वर्षांचा असेन। नीर्णय-सागरने छापलेले एकनाथांच्या भागवताचे सुंदर पुस्तक नुकतेच नीघाले होते, ते माझ्या हाती लागले। मराठी भाषेच्या द्न्यानेश्वरीच्या तोलाचा म्हणून गाजलेला तो ग्रंथ वाचल्या शीवाय मला सुटकाच नव्हती। पण पुस्तकाचा आकार पाहून मी दचकलो तर खरा। कारण, ग्रंथ द्न्यानेश्वरीच्या तोलाचाच नव्हे, पण तीप्पट तोलाचा होता। ओवी-संख्या दुप्पट, आणी दरेक ओवीची लांबी दीडपट। तरी पण चंग बांधून, समजले न समजले, पर्वा न करता, एकनाथी भागवत एकदाचे वाचून तर काढले। रोज एक अध्याय वाचायचा क्रम ठेवला। कोणता इंग्रजी महीना होता ते आठवत नाही, पण एकतीस दीवसांचा महीना होता, आणी महीन्या भरात पुस्तक संपले, इतके आठवते। अकराव्या अध्यायाने मात्र चांगलीच रग जीरवली। सरासरीच्या मानाने दुप्पट मोठा अध्याय। एकादश-स्कंधातील 'एकादशाध्याय' म्हणून नाथांनी त्या वर गौरवाचा शीक्का ठोकलेला। लीहीणाराने कंबर मोडून लीहीला तर वाचणाराने कां हार खावी, अशा वीर-वृत्तीने वाचून काढला। एवढा मोठा ग्रंथ, पहील्या वाचण्यात आणी त्या वयात, काय समजणार होता ? पण नाथांची पुण्याई आणी त्यांचे पुनरुक्तीचे बळ इतके दांडगे की काही ठसा उमटल्या

शिवाय राहणे अशक्य होते । 'भक्ती' म्हणजे सर्वां भूतीं भगवद्-भाव । भक्ती मध्ये जात-गोत नाही । उच्च-नीच नाही ।' एवढे माझ्या लक्षा त राहून गेले । आणि मला वाटते, एवढ्या त मला नाथांनी पास केले असेल ।

एवढा ग्रंथ-सागर पार उतरल्या चे आश्चर्य, आणि कर्तव्य केल्या चे समाधान, पदरा त बांधून ग्रंथ मिटून ठेवला । तो कितीक वर्षां त उघडला नाही । पुढे गीते शी तुलना करण्या साठी भागवता चा एकादश स्कंध पाहण्या ची गरज वाटली, आणि मग गाड्या बरोबर नळ्या ला यात्रा या न्याया ने एकनाथी भागवता चे दुसऱ्यांदा वाचन केले । जरी नळा गाड्या च्या दसपट लांब आहे हे माहीत होते, तरी धैर्या ने वाचत गेलो आणि या वेळी पूर्ण मोबदला पावलो । अपार आनंद झाला । समजायला ही ग्रंथ सोपा वाटला । भाषा ओघवती । पातळ पण पांचट नाही । पाना पाना त अनुभव भरलेला । नाथ म्हणतात, मी श्रीधरां ना अनुसरलो । श्रीधर म्हणाले असते, नाथां मुळे मी अमर झालो । एकादश स्कंधा वर तेवढ्या योग्यते चे विवरण हिंदुस्थान च्या दुसऱ्या भाषे त नाही हे मागाहून मला अवगत झाले ।

दरम्यान नाथां चे चरित्र मी वाचलेले होते त्या ने माझ्या चित्ता ला घेरून टाकले होते । विशेषतः मी होतो क्रोधी आणि नाथ त्या च्या नेमके उलट — शांती-जलधी । त्या मुळे ते चरित्र मला कल्याण-कारी भेषज च झाले । तथापि भागवत वाचण्या ची मात्र प्रेरणा होत नव्हती । या चे कारण दुसरे तिसरे काही नाही, भागवता चा आकार । ती गीते च्या निमित्ता ने झाली आणि लक्षा त आले की नाथां च्या त्या ग्रंथा ची सारवत्ता त्या च्या भारवत्ते ला कमी पडणारी नाही । त्या नंतर भागवत माझ्या सवडी प्रमाणे इकडून तिकडून अनेक वेळा चाळले ।

भागवता च्या परिशीलना ने नाथां च्या चरित्रा चे रहस्य मला अधिक उमगले । जसे जसे मी चिंतू लागलो, तसतसे ते चरित्र

माझ्या दृष्टी ला अधीकाधीक अुंचा वर गेले । पुढे माझ्या चीत्ता त अशी प्रतीती ठसली की नाथां चे भागवत जरी नीःसंशय महान, तरी नाथां चे चरीत्र त्या हुन ही महान आहे । सामान्यतः माणसा चे असे नसते । माणसा चा शब्द त्या च्या जीवना हुन नेहमी अुंच असतो । पण नाथां ची स्थीती या च्या अुलट दीसली । 'नाथां च्या घर ची अुलटी च खूण' असे लोक म्हणतात च । मला वाटते, आधुनीक काळा त महात्मा गांधीं चे या बाबती त आणी अीतर ही पुष्कळ बाबतीं त नाथां शी साम्य आहे । 'वाचा सत्यत्वे सोवळी, येर कवीता ओवळी' (भजन ४५), असा अुभयतां चा आदर्श होता, त्या चा हा परीणाम आहे ।

नाथां चे दुसरे ही प्रबंध-ग्रंथ पाहण्या त आले । ते सगळे च सद्भावने ने भरलेले आहेत । पण भागवता ची जादू त्या त नाही । या त नवल नाही । माणसा चे हृदय दहा वस्तूं त अुतरूं जाअू शकत नाही । बोलण्या चा चाळा म्हणून तो बोलत राहतो । लीहीण्या चा चाळा म्हणून तो लीहीत राहतो । भावने ने भारलेल्या माणसा ला आपले सगळे च अेकरस वाटते । अेकरस ते असते ही, पण सरस नसते । हे तो अनुभवू शकत नाही । दुसरा अनुभवतो । वर्डस्वर्थ ला वाटे, माझी प्रत्येक कवीता लेखणी ने न्हवे, हृदया ने लीहीलेली आहे । पण वर्डस्वर्थ चा परम भक्त जो मॅथ्यू आर्नोल्ड, त्या ने वर्डस्वर्थ च्या कवीते ची नीवड केली आहे । ते पुस्तक वर्डस्वर्थ च्या समग्र कवीते चा दशांश ही भरणार नाही । पण नाथ अीतके भ्रमा त राहीले असतील असे वाटत नाही । नाथां नी जी समरसता भागवता त अनुभवली ती च त्यां च्या अीतर प्रबंधा त ही अनुभवली असेल असे म्हणणे धाडसा चे होअील ।

# २. भारूड

भागवता त नाथाँ नी आपल³ हृदय सर्‌वसर्‌व ओतल³ असल³ तरी तो अ³क व्‌यवसर्‌थीत र:चल³ला पर्‌रबं³ध आह³ । पर्‌रबं³ध-गर्‌रं³था त ल³खका ला साहजीक :च काही मर्‌यादा असतात । ता मर्‌यादा साँभाळायचा, तर ल³खका ला आपल³ सर्‌वै³र अनुभव ता त माँडण³ शक्‌य नसत³। ता तद्न भागवता त नाथाँ ना शुकद³वा चा छं³दा ला अनुसराय:च³ होत³ । शुकद³वा :चा छं³द³:जरी नाथाँ चा आवडी :चा होता तरी सर्‌वच्‌छं³द-वीहार ही अ³क व³गळी :च वस्‌तु असत³ । ता मुळ³ तुकारामा चा गाथ³ त आपला ला :ज³ दर्‌शन होत³ त³ नाथाँ चा भागवता त होत नाही।अ³वढी अुणीव नाथा सारखा पर्‌रतीभावान: साक्‌षात्‌कारी पुरुषा ला कशी खपणार ? आपल³ अनुभव सर्‌वतं³तर्‌रपण³ नमूद करणा ची गर:ज ताँ ना भासला शीवाय कशी राहणार ? नाथाँ च³ त³ खासगी अनुभव शोधून काढणा चा अप³क्‌ष³ न³ मग मी ताँ चा अभं³गाँ चा गाथ³ कड³ वळलो ।

ह³ गाथा-साहीत्‌य फार :जुन³ आह³ । गाथा शब्‌द अृग्‌व³दा त ही अन³कवार आल³ला आह³ । पण गाथा अृग्‌व³दा प³क्‌षा ही पर्‌राचीन आह³ अस³ अृग्‌व³द स्‌वतः :च साँगून राहीला आह³ । पवमानस्‌तोमा :च³ स्‌तवन ‘ पुराणी गाथ³ न³ ’ करणा त आल³ असा अृग्‌व³दा त अ³क³ ठीकाणी अुल्‌ल³ख आला आह³ (अृग्‌व³द ९-९९-४) । गाथा ’मणज³ भक्‌ती-पर गीत अशा अर्‌था न³ काही ठीकाणी गाथ³ :चा पर्‌रयोग असतो । काही ठीकाणी गाथा ’मणज³ अनुभव-सार-रूप अुद्‌गार अशा ही अर्‌था न³ पर्‌रयोग असतो । या दुसरा अर्‌था न³ अन³क गाथा भारत-भागवतादीकां त य³त असतात । “ कामोपभोग³

न शमे ची काम" अशा अवस्था ची ययाती ची गाथा महाभारता त आलेली सर्व-श्रुत च आहे। ती अेक गाथा, 'मणजे तो च्या जीवना चे सार'। अशा च अितरां च्या ही अनुभव-गाथा अेकेक आहेत। अनुभव-पर गाथा हो प्रत्याया ने अुपदेश-पर ही असतात। तुकारामा च्या गाथे त आपल्या ला भक्ती-पर, अनुभव-पर, आणी अुपदेश-पर असे तीन्ही प्रकार चे सर्वोत्तम नमुने पहावयास सापडतात। मराठी भाषे चे थोर भाग्य !

पण 'गाथा' शब्द आणी गाथे चे हे दोन्ही-तीन्ही प्रकार आपल्या ला पारशां च्या धर्म-ग्रंथ जो झेंद अवेस्ता, त्या त ही पहावयास सापडतात। अवेस्ता तील अत्यंत स्फूर्ती-दायक भाग 'मणजे झरतुष्ट्रा च्या गाथा होत। झरतुष्ट्रा च्या गाथा पारशी समाज तीन हजार वर्षे गात आला आहे।

प्रबंध-ग्रंथ आणी गाथा ही वीचार-शैली ची आणी भाषा-शैली ची दोन टोके आहेत। पूर्वापर-संबंध, अेक-सूत्रता, वीकास-क्रम-नीदर्शन, हा प्रबंधा चा आत्मा आहे। मोकळेपणा, सुटे-पणा, वीखुरलेपणा, सहज-स्फूर्ती, वीशृंखलता, कींबहुना अुच्छृं-खलता हे गाथे चे स्वरूप आहे। भारतीय साहीत्या त प्रबंध-साहीत्य आणी गाथा दोन्ही भरपूर आहेत। संतां च्या वाणीत गाथा-साहीत्या ची रेलचेल आहे। शीखां चा ग्रंथ-साहेब, कबीरादीकां ची 'बानी', तमीळ आळवारां ची भजने, अीत्यादी सर्व गाथा-साही-त्य च आहे, जरी गाथा हे नाव त्या ला लावले गेलेले नाही।

गाथे च्या अपेक्षे ने अेकनाथां ची गाथा चाळून पाहीली तर ती त पुष्कळसा वेगळा च प्रकार दीसून आला। सर्वोत्तम गाथे चा ही थोडा भाग आढळला पण बाकी सर्व लीखाण टाचण-टीपणां च्या स्वरूपा चे दीसले। नाथां नी जेव्हा पासून लीहायला आरंभ केला, तेव्हा पासून अखेर पर्यंत तें नी जे काही लीहीले त्या सर्वा चे ते संग्रहालय दीसले। हाय-स्कूल कॉलेजा त शीकत असताना

मी अेक मली मोठी हजार-पानी वही शीवून घेतली होती । अेक कार्पींग पेन्सील ही मी त्या वही ला बांधून ठेवली होती । मला जें जें सुचे आणी जें जें रुचें तें सारें मी त्या वही त टीपून ठेवीत असें । त्या वही ला शेवटीं मी अेक सूची जोडली होती । तीनें वीस्कळीतपणा ला व्यवस्था आणली होती । अेकनाथी गाथा पाहून त्या वही ची मला आठवण झाली । अेकनाथी गाथें तील पुष्कळशा लीखाणा ला अलीकड चे साहीत्तीक टीकाकार गाथा न 'मणता भारूड 'मणतील । आणी गमती ची गोष्ट ही की नाथां च्या भक्त-मंडळी त ही हा पुष्कळसा म्जकूर अेकनाथी भारूड 'मणून च संबोधीला जातो । तें दूषण-रूपा नें 'मणतील,यां नी तो गौरवा नें घेतला आहे।

पण भक्त-मंडळीं नी ही जी संद्न्या दीली आहे ती सबंध गाथें ला अुद्देशून नाही । गाथें त जो समाज-शीक्षणा चा रूपक-पर आणी काहीसा गूढ भाग आहे, त्या ला लावली आहे । 'मणजे हा अेक पारीभाषीक शब्द समजला पाहीजे । या भारूड शब्दा चा अर्थ आणी व्युत्पत्ती श्री. कुळकरणी यां च्या मराठी व्युत्पत्ती-कोशा त अशी दीली आहे :

**भारूड** (न.) लांब गुंतागुंती चें गाणें, कथा, अवघड कूट काव्य, पंचाअीत, संकट, वीघ्न (लक्षणा) ।
[ सं. बहुरूपक—भारूड ।
भारत + रूढ ( शब्द-कोश )
पहीली व्युत्पत्ती अधीक सयुक्तीक ]

दुसरी व्युत्पत्ती कोशकारा नें च अवमानीली असल्या मुळें धऱ्याना त घेण्या ची जरूरी नाही । पण पहीली व्युत्पत्ती देखील मान्य होण्या सारखी नाही । बहुरूपक चें भारूड होणें संभवनीय नाही । झाल्यास 'भोरूड' होअू शकेल— जसें बहुरूपी चें भोरुपी झालें आहे । अटकळ च करायची तर भार + गूढ = भारूड अशी करता येअील । अर्थतः ही अटकळ समर्थनीय ठरेल । अक्षरतः फारशी

दुरावणार नाही। भारलेले गूढ अथवा भारवान गूढ अथवा साध्या मराठी त भारी गूढ असा त्या चा अर्थ होईल। तो कोशा त दीलेल्या अर्था ला जुळता आहे। एकनाथां ची बरीच शी भारुडे धर्मठां नी रूढव-लेल्या मीथ्याचारा वर कोरडे ओढणारी असल्या मुळे त्यां ना त्यां ची मोठी 'पंचाईत' झाली असेल। तरी त्यां ना 'संकट'-रूप, कींबहुना 'वीघ्न'-रूप ही भासली असतील। त्या दृष्टी ने भारूड चे कोशा त दीलेले ते ते अर्थ चांगले शोभण्या सारखे आहेत। शीवाय सदर भारुडां ची भाषा उकलण्या ला कठीण असल्या मुळे व्याख्यानकारां ना त्यां ची 'पंचाईत' झाली असेल, आणी तरी त्यां ना 'संकट'-रूप आणी कधी कधी श्रोत्यां च्या तावडी तून सुटायला 'वीघ्न'-रूप ही झाली असतील। त्या ही दृष्टी ने ते ते अर्थ साजरे ठरतात। पण 'लांब-लचक-पणा', 'गुंतागुंत' आणी 'कूट शैली' हे भारुडातले मुख्य लक्षण आहे। त्या दृष्टी ने गाथ्या तील हा भारूड भाग व्यवस्थीत उकलण्या चा यत्न कुणी तरी करण्या सारखा आहे। त्या तून एक-नाथ-कालीन समाज-स्थीती वर चांगला प्रकाश पडेल, ऐतीहासीक द्न्याना त भर पडेल, आणी मराठी भाषे च्या काही लकबीं चा ही उलगडा होईल। हे काम उपयोगा चे आणी मनोरंजक असले तरी वस्तुतः 'गाथे' च्या क्षेत्रा त येत नसल्या मुळे, आणी माझ्या ही गरजे बाहेर चे असल्या मुळे, मी हा संबंध वीभाग सोडून दीला आहे।

# ३. भजनें

पण तो सोडून ही उरलेला मुख्य जो गाथा-विभाग 'म्हणायचा, त्यांत ही भक्त-जनांच्या पारिभाषिक अर्थाने न'वे, साहित्यिकांच्या नेहमीच्या अर्थाने भारूड कमी नाही। या ची दोन-तीन कारणे आहेत। ती लक्षांत घेतली 'म्हणजे यांत आश्चर्या सारखे नाही। एक कारण हे आहे की नाथांना पुराण सांगण्याची सवय होती। त्या मुळे त्यांचे लिहिणे पुष्कळ वेळा बरेच पघळ असते। भागवतांत ही तसा प्रकार आहेच। पण तेथे तो दोषरूप झाला नसून त्याला विशिष्ट गुणवत्ता आली आहे। वाचकांच्या चित्ता वर विवेचनाचा स्पष्ट ठसा उमटावा अशी तेथे अपेक्षा आहे। गाथेतील प्रत्येक उद्गार स्वतंत्र स्वरूपाचा असल्या मुळे ग्रंथा सारखी अपेक्षा तेथे नसते। त्या दृष्टीने पघळपणा, पाल्हाळ, अतिरिक्त पुनरुक्ती दूषण ठरू पाहते। पण पुराणिकाची सवय पुराणिक टाळू शकत नाही। सार-ग्राही आधुनिकांना ती जबाबदारी उचलायची आहे। दुसरे कारण, शिक्षक तोच तोच गोष्टी जवळ जवळ त्याच त्या भाषेत वेगवेगळ्या विद्यार्थ्यांना पुनः पुनः सांगत असतो। त्या सगळ्या जर एकत्र टाचून ठेवल्या तर भविष्य-कालीन संपादका साठी ती एक कामगिरी योजून ठेवली, इतकाच अर्थ होतो। तसे इथे झाले आहे। ही सारी टाचणे टिपणे अथवा कथने कवीला कवना ची सवय 'म्हणून कवितेत लिहिली असली तरी ती सारी जशी च्या तशी प्रकाशिली जावी अशी लेखकाची अपेक्षा नाही। मोरोपंतांनी निरनिराळ्या छंदांचा सराव 'व्हावा 'म्हणून आपली आवडीची राम-कथा शेकडो वेळा गाइली आणि

छ॑द:-प्‌रभ॒त्‌व स॑पादील॓ । तो अ॓क कौत॒का :चा वीषय आह॓ । पण त॓ सार॓ भरताड आ:जच॓ वाचक वा:चणा च॓ नाकारतील तर मोरो-प॑तां :चा ता न॓ वीरस होणार नाही, अ॒लट सौरस :च होअील । नाथां चा बाबती त कारण व॓गळ॓ असल॓ तरी फलीत त॓ :च आह॓ । तीसर॓ कारण अस॓ ही समजावयास पाहीज॓ की नाथां चा नावा वर आ:ज छाप-ल॓ली गाथा तीं चा नावा वर असली तरी ती:च॓ कर्‌तृत्‌व :जस॓-चा-तस॓ तीं नी अ॒:चलल॓ :च पाहीज॓ अशी काही तीं चा वर :जबाबदारी नाही । अ॒दाहरणार्‌थ, चीत्‌रशाळ॓ न॓ :जो नाथां :चा गाथा छापला आह॓ ता त श॓वटी 'श्‌री अ॓कनाथ महारा:ज कृत गीतासार' म्‌हणून अ॓क ओवी-बद्‌ध ग्‌र॑थ :जोडला आह॓ । ता :चा गीत॓शी काही स॑ब॑धु नाही, आणी नाथां शी ही स॑ब॑ध नाही, ह॓ ता चा भाष॓ वरून नाथां चा साहीत्‌या शी परीचय असल॓ला कोणी ही सांगू शक॓ल । अशा प्‌रकार॓ अन॓कां :चा हातभार लागून आमचा अन॓क :चांगला :चांगला ग्‌र॑थां :चा :च॒थडा :झाल॓ला आह॓ ह॓ नाकारता य॓णार नाही । अशी ही अन॓क कारण॓ आह॓त । ता म॒ळ॓ गाथ॓ तील भार॒डा :चा भार प॒ष्‌कळसा आपोआप :च हलका होणार आह॓ ।

तसा तो हलका क॓ला न॑तर अ॒र्‌वरीत भागा :च॓ अवलोकन करता ता त फार मोला ची अ॒ज्‌ज्‌वल रत्‌न॓, अन॒भवा चा कांती न॓ :चमक-णारीं, सूक्‌ष्‌म चींतना न॓ व॓धून समर्‌पक शब्‌दां त ओवल॓लीं आढळून य॓तात । माझा तर अस॓ ही लक्‌षा त आल॓ की नाथां :च॓ आत्‌म-चरीत्‌र जीतक॓ तीं चा द॒सरा कोणता ही ग्‌र॑था त प्‌रकट :झाल॓ नाही, तीतक॓ त॓ गाथ॓ तील काही काही अभ॑गां त आणी पद्‌यां त प्‌रगट :झाल॓ल॓ आह॓ । कीत्‌य॓क ठीकाणीं अ॓कनाथी भागावता तील अ॒त्‌कृष्‌ट वीव॓चन॓ ता॑ हून ही अधीक न॓मका आणी व॓:चका शब्‌दां त अ॓क॓का लहानशा अभ॑गा त गोवल॓लीं आह॓त । अ॓क :च अ॒दाहरण द॓तो :

अग्नी सत्त्व नीपजे अन्न । तें वाफ जीरतां परमान्न
पोळी अवशेष तापलेपण । रांधीतें ही जाण चवी नेघे॥
आंब्या पाडू लागला जाण । तरी अंगीं असे आम्लपण
सेजे सी मुरलीया मघमघोन । न चाखतां घ्राण चवी सांगे॥
सेजे मुरावयाची गोठी । तेथ नेवाळी देवता ची दीठी
येरयेरां जाहलीया भेटी । दोन्ही शेवटीं ठीकाळती॥........

—एकनाथी भागवत, १२.५१७–१९ ।

या तीन ओवी शी अभंग ७४ तोलून पहावा । अशीं अनेक उदाहरणें आहेत ।

धर्म आणी तत्त्व-ज्ञान यां चें जें काही वाचन मी केलें आहे तें सारें माझ्या चींतना ला मदत म्हणून, केवळ आत्म-समाधाना साठी केलें आहे । नाथां च्या गाथे तील अनुभव-रत्नें देखील माझ्या उपयोगा साठी मी अनेक वर्षें सावकाश नीवडीत आलो आहे । त्यां चा हा एकत्र संग्रह एकोणीसशे एकेचाळीस सालीं मी जेल-मधे असताना प्रथम प्रकाशीत केला गेला। आता दुसर्‍या आवृत्ती च्या वेळीं त्या-वर मी पुनः बारकाई ने नजर टाकली आहे । काही अभंग बदलून घातले आहेत। जुळणी त ही कींचीत् बदल केला आहे । आता ही नीवड आणी जुळणी, दोन्ही माझ्या मना जोगत्या झाल्या आहेत। सबंध गाथ्या तून केवळ तीनशें पद्यें घेतलीं आहेत। गणीता च्या भाषे त बोलायचें म्हणजे अती-संक्षेप-रूप दीलें आहे।

हीं वचनें मुळा त मोकळीं आहेत । आणी येथें जरी प्रकरणा त बांधून त्यांना वीशीष्ट आकार दील्या सारखें केलें आहे, तरी तीं मोकळीं च समजायचीं आहेत । वीशीष्ट आकार देण्यातला हेतु साधका ला पहील्या पासून अखेर पर्यंत साधनें चा ओघ नीरखता यावा एवढा च आहे । ती ही नीरखता ने मोकळेपणा ने च करायची आहे । पूर्वापर-संबंधा च्या कैची त न सांपडता आणी

वीसरकळीत ही न होता नउसता अनउबंध पाहून घम्वा, 'मणजे योजने :चा अपेकषीत लाभ पदरा त पडेल ।

नीवड करणा त कधी कधी असा अउददेश असतो की वाचकां ना गोडी लागून मळूचची सबंध कृती पाहणा ची तीं ना पररेरणा 'वावी । माझा अउददेश नेमका या चा अउलट आहे । ही नीवड आतमसात केली 'मणजे तेवढा ने साधका :चे काम भागावे, ता ला मळूचा अफाट वीसतारा त संचरणा ची गरज राहू नये । जी मेहनत आ'मा ला करावी लागली ती ता ला करावी लागू नये, असा या त अउददेश आहे । 'मणून नीवड वे:चक असली तरी सांगोपांग केली आहे। नाथां :चे या नीवडी ने समाधान होअील या वीषयी मी नी:संशय आहे । हे नीवडलेले अभंग माझ्याशी मी शेकडों वेळा घोळलेले आहेत आणी माझी खातरी :झाली आहे की

लौकीका परता नेवे हा वीभाग,
साधले अवयंग सउख-सार ।
अवीट वीटेना ................ (भ. ७८)

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

# ४. स्थूल चरीत्र

या अभंगांत नाथांचा अनुभव कसा प्रगटला आहे, ते पाहण्या पूर्वी नाथांच्या चरीत्राचे थोडे चींतन उपयोगी होईल। स्थूल चरीत्र सर्वांना माहीतच आहे। आपणाला मुख्यतः त्यांचे भाव-चरीत्र पहायचे आहे। तथापी स्थूल चरीत्राचा ही थोडक्यात आराखडा पाहून जाऊ।

पैठण येथे भक्त भानुदासांच्या कुळात नाथांचा जन्म (ईसवी सन १५३३)।

त्यांचे गुरु सुप्रसीद्ध जनार्दन स्वामी।
समानशील साध्वी गीरजाबाई शी त्यांचा वीवाह।
अमर-कृती भागवत। पहीली पंचाध्यायी पैठणला।
पुढील अध्याय काशीला। समाप्ती सन १५७३। वय चाळीस।
दोन वर्षांनंतर जनार्दन स्वामींचा मृत्यु (सन १५७५)।
ज्ञानेश्वरीचे संशोधन, सन १५८४।
नाथांचा मृत्यु सन १५९९, वय सहासष्ट।

नाथांच्या परीवारात त्यांचा अयाचीत सेवक श्रीखंड्या, त्यांच्या मुलीचा मुलगा प्रतीभावान कवी मुक्तेश्वर, त्यांच्या मागून सुमारे दहा वर्षांनी जन्मलेले त्यांचे मानसपुत्र तुकाराम महाराज — ही नावे महाराष्ट्राला अवीस्मरणीय आहेत।

नाथांचे समकालीन : गोस्वामी तुलसीदासजी। नाथांच्या एक वर्ष आधी जन्मास आले। नाथांच्या भागवताशी तुलनीय त्यांची अमर कृती 'रामचरीत-मानस' उर्फ तुलसी रामायण। समाप्ती-

काळ सन १५७४ । भागवत-समापती नंतर अेक वरषा ने । तो वेळी तो ंचे वय ४२ । नाथां चा भागवता परमाणे ंच तुलसीरामायणा ंचा ही अधीक भाग काशी ला लीहीला गेला आणी समापती ही काशी ला ंझाली । 'मणजे हे दोन महापुरुष अेका ंच काळी काशी ला जनते ची पापे धुअून टाकणारे गंगाजल-तुल्य असे आपले दीव्य गरंथ गंगे चा काठी लीहीत होते ।

सथूल चरीतरा ंचा आराखडा येथे संपतो ।

# ५. भाव-चरीत्र

आता भाव-चरीत्र पहाय:चे ।

(अ) मनुष्य:या :चे भाव-चरीत्र अथवा अंतर:जीवन :जरी मुख्यत: तो चो स्वत: चो भावने :चे बनलेले असते तरी ती भावना बनवणो त अीतरां :चा ही पुष्कळ हात असतो । नाथां चो भावने :चा मूळ गाभा तो चो कुळा त पूर्वापर :चालत आलेलो भक्ती-संस्कारां :चा आहे । तो :चे पणजे भानुदास यां :चे सारे जीवन वीठ्ठला चो भक्ती ने भावीत :झाले होते । तो :चा मृत्यु (अी० स० १५१३) आणी नाथां :चा जन्म यां त फक्त वीस वर्षा :चे अंतर होते । आणी नाथां :चे आअी-बाप लहानपणी :च वारलो मुळे तो :चे आजे चक्रपाणी यां नी :च तो :चे संगोपन केले । साहजीक :च चक्रपाणी यां चो मुखा तून भानुदासां ची जीवन-गाथा नाथां ना लहानपणी अनेकवार अैकावयास मीळाली असेल । भानुदासां चो जीवनातली मुख्य घटना वीठ्ठला ची मूर्ती, जी वीजयनगर :चा धर्म-नीष्ठ राजा कृष्णराज या ने बहुधा संरक्षणा चो अुद्देशा ने वीजयनगर ला नेअून ठेवली होती ती,पुन: पंढरपुरा स परत आणणे ही आहे । अैथादो राज्य-स्थापने हून ही घटना कमी महत्त्वा ची नाही । असंख्य भक्त-जनां ची जी अधीदेवता तीचो मूर्ती :चे रक्षण करणो ची शक्ती तो भक्त-जनां त नसावी आणी ती:चे रक्षण करणो ची पाळी राज्य-सत्ते वर यावी या सारखी भक्ती ला लांछन लावणारी गोष्ट आणीक कोणती असू शकेल? राजा कृष्णराजा ला मूर्ती चो सुरक्षीतते ची खातर :जमा :झालो शीवाय ती मूर्ती परत आणणे शक्य :च न्हवते । आपलो भक्ती

चठ बळा वर सरव भकत जनां :चा परतीनीधी बनदन ज'वा तशी आतरी भानउदास द'अद शकल' त'वा :च तो ठ'वा ती ना परत मीळवता आला, ह' अउघड आह' । या ती चठ कती न' ती नी भकत जनां ची :च न'व', पण सबंध महाराषट्र द'शा ची लाज राखली । भकती चठ कष'तरा तील हा ती :चा महापराकरम बालपणी नाथां चठ काना वर कीती व'ळा पडला अस'ल या ची आपण कलपना करद शकतो । :जसा घडा सबंध माती :चा बनल'ला असतो, तस' नाथां :च' बाल मन या घटन' :च' बनल'ल' आह' । ती ना ती घटना अ'का अदभउत चमतकारा सारखी जीवन-भर आटवत अस'ल । द'वा-भकतां :च' परसपर-पर'म वरणीत असता

' :जरी द'व न'अउनी घातला ददरी,
परतोनी पाह' त'व घरा भीतरी । ' ( भजन १९ )

अस' नाथां नी ज' चमतकार-पदरण वरणन क'ल' आह', त' करताना ती चठ डोळठ समोर कउणा :च' चीतर अस'ल ? 'स'त आधी द'व मग' (भ. १३०), 'भकत द'वा :चा ही बाप' (भ. २२४), अीतयादी अउल'ख तठ :च सफदरती-सथाना तदन नीघाल'ल' आह'त । भानउदासां :च' मतयउ-समयी पासषट वरषा :च' वय होत' । नाथां :च' त'वढ' वय होता :च नाथां ना ही द'ह-वीसरजना ची पर'रणा झाली । अीतक' ती :च' जीवन भानउदासां चठ समरणा न' भारल'ल' होत' ।

(आ) आपण भानउदासा सारख' 'वाव' अशी तळमळ लहानगठ अ'कनाथा ला लागदन राहीली होती । तों :च ती ना मारग-दरशक ही सापडला । :जवळ :च द'वगीरी ला जनारदन सवामी राहत असत । बारा वरषा चठ वया त नाथ ती चठ कड' पो:चल' । आणी ती नी ती ची अरध घडी आराम न घ'ता, आणी तहान-भदक वीसरदन ( भ. १७३ ) दीरघ काल स'वा क'ली। श'वटी ती ना गउरद पासदन जी ददषटी लाभली ती 'जनी जनारदन' या सदतर-वाकया त नाथां नी आपलठ सबंध साहीतया त अस'खय व'ळा अउल'खीली आह' :

जन तेची जनार्दन, अेका जनार्दनी भजन (भ. ४५)

जनीं जनार्दन प्रत्यक्ष, डोळां कां न दीसे या सी (भ. १८६)

अेका जनार्दनी जनीं जनार्दन, तयासी नमन (भ. २४५)

साकर दीसे परी गोडी न दीसे, ती काय ते वेगळी असे,

तैसा जनीं आहे जनार्दन (भ. २७५)

जन नोहे अवघा हा जनार्दन (भ. २८५)

अवलोकीतां जन, दीसे जनार्दन (भ. ३००) अीत्यादी स्थळें या च भजन-संग्रहा त पहायला सापडतात। ते चे अीतर साहीत्या त ही तीं अशीं च भरपूर आहेत।

“जनैर् अर्द्यते याच्यते अीती जनार्दनः” सर्व लोक जे ची याचना करतात, जे चे पाशी मागतात, तो जनार्दन। या व्युत्पत्ती ने जनार्दन-शब्द परमेश्वर-वाची सर्व-श्रुत आहे। आपले पुरतें गुरु-स्मरण ही नाथां नी ते त साधून घेतलें आहे। ‘भज गोवींदम्’ मधे शंकराचार्यां नी सर्व लोकां साठी अीश्वर-भक्ती चा आदेश देअून आपले गुरु-भक्ती चा ही नीर्देश गोवून टाकला; कारण, ‘गोवींद’ हें ते चे गुरु चें ही अभीधान होतें। नाथां नी ही ती च कल्पना अुचलली, कारण ते ची ही तशी च श्रद्धा होती (भ. १७२)। आपली गुरु-भक्ती अीतरां वर लादायची नाही, आणी आपली सोडायची नाही, अशी ही शीष्टां ची रीत आहे।

‘जनीं जनार्दन’ हें सूत्र आता सर्व च भारतीय भाषां त आढळून येतें। ते चा अुगम कुठून झाला हें नीश्चीत सांगणें कठीण आहे। ते चा प्रसार गोदे पासून गंगे पर्यंत चे भागा त तरी मुख्यतः नाथां मुळें झाला, असें असणे चा संभव आहे। जन-सेवा ही च जनार्दन-पूजा आहे असें वाक्य मला मलयालम् भाषे मधे वाचावयास मीळालें होतें। मलबार मधे परमेश्वरा चें जनार्दन हें नाव वीशेष ख्यात आहे। जनार्दना चें अेक फार मोठें देव-स्थान तीकडे आहे। तसें जनार्दन हें नाव वीष्णु-सहस्र-नामा त

संग्रहीत असल्या मुळे अखील-भारतीय च आहे । जसे 'वीठ्ठल' आणी 'पांडुरंग' हे महाराष्ट्रा चे च दुसरी कडे पसरले, तसे जनार्दना चे नाही । सारांश, 'जनी जनार्दन' या सूत्रा चे अेखादे वीशीष्ट अुगम-स्थान नसणे चा च संभव आहे; आणी ते च योग्य आहे । कारण, वीशाल कल्पना या अुगम-रहीत च शोभतात, आणी अुगम-रहीत च असू शकतात । तथापी गुरु-कृपे ने लाभलेला हा बोध नाथां नी आपल्या जीवना त मुरवला, त्या वर च सारे जीवन रचले, या बद्दल सबंध महाराष्ट्रा ची साक्ष आहे । म्हणून मराठी भाषे पुरते बोलायचे तर या मंत्रा चे द्रष्टे जनार्दना चे शीष्य अेकनाथ च ठरतात ।

जन-सेवा हे मानवा ला सहज अुपलब्ध असलेले अीश्वर-भक्ती चे अत्यंत सुलभ आणी तीतके च समर्थ साधन आहे, या वीचारा ला वेदा पासून वैष्णव संप्रदाया पर्यंत च्या साहीत्या तून आधार दाखवीता आले तरी, कोणत्या ही कारणा मुळे असो, येथील साधकां च्या साधने त अेकंदरीत त्या चा प्रभाव कमी च अुमटलेला आहे; येथील साहीत्या चा सारा ओघ पाहून या चे कारण माझ्या पुरते मी असे ठरवीले आहे की जन-सेवे चे काम वर्ण-व्यवस्थे ने परभारे च होअून जाते, अथवा जावे, अशा कल्पने ने साधकां नी अंतरंग साधने तून हा वीचार वगळला । पण वर्ण-व्यवस्था गेली हजार दोन हजार वर्षे मूळ च्या परीशुद्ध स्वरूपा त कुठे च अमला त न'वती, अुलट ती चे वीकृत रूप च सर्वत्र अंमल गाजवीत होते । त्या मुळे साधकां ची कल्पना कल्पने त च राहून गेली । वस्तु-नीष्ठ वीचार करणारे जे थोडे सूक्ष्म दृष्टी चे आणी जन-संपर्का त राहणारे साधकां नी ही गोष्ट हेरून घेतली, त्यां त नाथां ची ठळकपणे गणना होते । जनार्दन स्वामी स्वत: जन-सेवे त राबणारे च साधक होते । ते त्या वेळ चे अेक सरकारी नोकर च होते । या बाबती त त्यां चे न्याय-मूर्ती रानडे यां चे शी साम्य आहे । अुपमा

अक्षरशः घ्ययचीं नाहीं। न्याय-मूर्ती रानड' अ'क तळमळीं :च' भक्त होत', आणी जनार्दन स्वामीं मुक्कामा वर पो:चल'ल' सीद्ध पुरुष होत'। पण या फरका मुळ' जनार्दन स्वामीं नीं :जाणून बुजून वीशीष्ट मर्यादा पत्करून क'ल'लीं जन-स'वा अधीक :च खुलून नीघत'। अशा गुरू पासून दृष्टी लाभल'ला अ'कनाथ जन-स'व' चा वीचारा न' अंतर्-बाह्य भरून ग'ला या त नवल नाहीं। 'संसार ब्रह्म-स्फूर्ती,सांडोनीयां अहंकृती— (भ. २५९)। परमार्थ' साध' सहज संसार, सहज संसार' घड' परमार्थ— (भ. २०)। जगाचीय' न'त्रीं दीस' तो संसारीं, तरी तो अंतरीं स्फटीक-शुद्ध— (भ. २१)।' अीत्यादी आत्म-वीश्वासा :च' उद्गार अनुभवा शीवाय कोण काढू शकणार ? अ'क' ठीकाणीं तर नाथां नीं य'थ पर्यंत 'मणून टाकल' कीं अीश्वर-भावन' न' सर्व भूत-स'वा करण' ह' बहीरंग साधन :च न'व' तर अंतरंग साधन ही आह'; कींबहुना सर्व :च साधन-त' आह'। ध्यान भक्ती वीव'क वीरक्ती सर्व :च तीं त य'अून :जात' (भ. २१४)। या हून अधीक नीकरा चीं भाषा काय असू शकणार ?

या ठीकाणीं अ'का गोष्टीं कड' लक्ष व'धण' :जरूरीं :च' आह'। 'जन त' ची जनार्दन' अशीं खूण-गाठ बांधून ही नाथ सहसा ' जन-स'वा ' असा शब्द योजीत नाहीत। जनार्दना चीं स'वा, कींवा भगवद्-भाव, अशीं भाषा बोलतात। या त अ'क दृष्टी आह', आणी ती :च मला तरीं मानवत' आणी अधीक योग्य वाटत'। अ'कदा अ'का हरीजन-स'वका ला मीं लीहील' होत'—'हरीजनां चीं अथवा सामान्य-जनां चीं होअील तीं स'वा आपण अवश्य करू। पण आपण हरीजन-स'वक अथवा जन-स'वक न होता हरी-स'वक :च होअू या।' 'जन त' ची जनार्दन' या :चा अर्थ जन-स'वा हीं आपोआप :च जनार्दन-स'वा होअून :जात' असा करण' अनुभवा ला धरून नाहीं! कोणतीं ही स'वा हरी-भावन' न' भावीत होअील त'व्हा :च तीं हरी-स'वा ठर'ल। अ'र'वीं तीं अन'क प्रकार चा राग-द्व'षा त, आसक्तीं त, पक्ष-पाता त,

लोटू शकते । केवळ व्यक्तिगत स्वार्थी जीवना पेक्षा जन-सेवे च्या जीवना त चिंतना ची लांबी रुंदी वाढली तरी खोली वाढते च असे नाही । म्हणून हात-पाय जन-सेवे त राबवीत असता चित्ता ची हरी शी गाठ घालणे श्रेयस्कर आहे ।

(ई) 'जनीं जनार्दन' एवढी गुरु-कृपा-दृष्टी घेऊन नाथां नी गृहस्थाश्रम सुरू केला । पण त्यां च्या हातून ज्या ला ते ' सहज संसार ' म्हणतात तो सहज-गत्या घडून येण्या ला त्यां च्या समानशील सह-धर्मचारिणी कडून अमूप मदत मिळाली । पती च्या व्रतमय जीवना त विलीन होणाऱ्या त्या पतिव्रते च्या नावा चा उच्चार तिच्या इच्छे विरुद्ध नाथ कसे करू शकणार ? तथापि एका अभंगा त त्यां नी त्या नावा चा अगदी अभावितपणे बेमालूम उल्लेख करून ठेवला आहे :

"संतां वांचूनीयां नाम न ये हाता, साधनें साधितां कोटी जाणा"
"जैसें कांते वीण करणें संसार, साधन-विचार व्यर्थ ठेला ।"
(भ. १५७)

"कनक-कांता न ये चित्ता, तो ची परमार्थी पुरता" (भ.४५) यातली कांता वेगळी आणि ही कांता वेगळी हे जाणाक्ष वाचकां च्या लक्षा त आल्या शिवाय राहणार नाही ।

(उ) भानुदास, जनार्दन स्वामी, आणि गिरिजाबाई या तिघां शिवाय आणखी एक चौथा होऊन गेला, ज्या ने नाथां ची 'जनीं जनार्दन-भावना' अत्यंत दृढ झाली । नाथां च्या साधुत्वा च्या सुगंधा ने अनेक भ्रमर ओढले गेले त्यां त एक पंधरा-सोळा वर्षा च्या देहा ने आणि मना ने बलवान असा एक बाल होता । नाथां च्या घरी सेवे साठी आलो आहे असे म्हणून त्या ने आश्रय मागितला । नाथां नी तू कोण, कुठला, म्हणून विचार-पूस केली असेल । त्या ला बटू 'वामना' ने बळी ला जशी उत्तरे दिली तशा सारखी त्या ने

श्र्ल॑ष-यूकत अूततर॑ दीलॊं असतील की काय कूणास ठाअूक। अथवा श्र॑कराचार्यां चॆ तॆ हसतामलका सारखॊं दीलॊं असतील! मी तॆ व॑ळॊं हजर न'वतो आणी 'मणून मला तॊं काहॊ माहीत नाहीत। तॆ ला नाथां नी आपलॆ घरॊं ठ॑वून घ॑तल॑ आणी च॑दन अूगाळण॑, पाणी वाहून आणण॑, अीत्यादी द॑व-स॑व॑ चॊं काम॑ तॆ ला सोपवीलॊं। तो तॊं अ॑कनीष्ठपण॑ करू लागला। आणी चोवीस तास आनंदा न॑ राहू लागला। दहा-बारा वर्ष॑ तो गूरू-दास्या न॑ कृश आणी गूरू-पर॑मा न॑ पूष्ट झाला। तॆ च॑ तारूण्य लक्षून नाथां नी गीरजा बाअी समोर लोक-रीती स अनूसरून तॆ चॆ वीवाहा ची गोष्ट काढली। तो मूलगा दूसरॆ दीवशॊं काही च न कळवता गूपचूप नीघून ग॑ला, तो कधी च परत आला नाही। अथवा तॆ ची पूढ॑ काही खबर ही कळली नाही। हरी-पर॑मा न॑ र॑गल॑लॆ नाथां चॆ मना न॑ घ॑तल॑ की या रीती न॑ परम॑श्वरा न॑ च माझॆ घरॊं य॑अून माझॆ कडून काही च स॑वा न घ॑ता माझी स॑वा क॑ली। आणी तॆ ची काही स॑वा करणॆ ची मी गोष्ट काढलॆ बरोबर तो नीष्काम प्रभू माझॆ दृष्टी त दूनयानां जन घालणॆ साठी नीघून ग॑ला।

''श्रीअ॑कनाथ-सदनॊं माधवजी सर्व काम ह॑ करीतो'' अस॑ भावीक लोक बोलत च आह॑त। पण नाथ ही स्वमूखा न॑ तस॑ च 'मणत आह॑त (भ. २३३)। हा चौथा न॑हमी च भक्तां चॆ जीवना त कूठ॑-ना-कूठ॑ हात घालीत असतो। आणी तॆ चॆ स्पर्शा न॑ तॊ च॑ सबंध जीवन तो भारून टाकीत असतो। भक्त मग तॆ चॆ साठी आपला द॑ह रीकामा करीत असतो आणी तो च तॆ चॆ द॑हा त कायम चा नांदत असतो। नाथां ची श्रीखंडॆ चॆ स्पर्शा न॑ अशी दशा झाली। आणी कूणा ला ही मानव-रूपा त पहावयाच॑ नाही, हरी-रूपा त च पहावयाच॑, असा तॊं नी कायम चा नीश्चय करून टाकला।

दा.क्र. ........

## ६ 'जन हे ची जनार्दन'

(अ) जन-सेवे चे आणी हरीजन-सेवे चे रूपा त हरी-सेवा करायची असा जे :चा जीवन-नीर्णय झाला ते चे जीवना :चे आणी चींतना :चे आणी आकांक्षे :चे स्वरूप आपण कल्पू शकतो। :जसे ते आपण कल्पू तसे :च ते नाथां :चे :झाले आहे । आपण अेक अेक कल्पना करू या आणी नाथां पासून धडा घेऊ या ।

' जन ते ची जनार्दन ' या मूल सीद्धांता तून साधना कर्म-योगमय असावी हा अुपसीद्धांत अगदी युक्लीड चे पद्धती ने नीष्पन्न होतो। 'कर्म' म्हणजे की कर्मठपणा आणी कर्मा चे पाठी मागे धावत सुटणे, हे दोन दोष चीकटू पाहतात। अुलट, 'योग' म्हणजे 'म्हणजे कर्म-शून्य काल्पनीक ध्यान-साधने कडे कल :जातो। कर्मा-ग्रही पुरुष आत्मा ची मूळ 'नीष्कर्म' भूमीका गमावून बसतो। कर्म सोडून काल्पनीक ध्याना चे मागे लागणारा पाय खंडून वाट चालू पाहतो । कर्मयोगी हे दो'नी दोष टाळतो । तो ओघा ने आलेले सहज-प्राप्त कर्म आचरून ते :च भगवंता ला अर्पण करून मोकळा होतो(भ.१८,१९)। तो शुद्ध-अशुद्धा :चा ही फार वाद घालीत नाही । कर्म अधीका-त-अधीक शुद्ध आचरावे ही तर ते ची दृष्टी राहते :च (भ. १०५) पण शेवटी "सहज-प्राप्त ते कर्म न सोडावे सदोष ही" या गीता-वचना प्रमाणे ते ची भूमीका असते। नाथां नी आपले सबंध साहीत्या त कर्मयोगा :चे समत्व-युक्त समर्थन केले आहे। आणी तें :चे स्वतः :चे जीवन ते :चे अुत्तम अुदाहरण :झाले आहे ।

(आ) लोक-सेवक कर्‌म-योगी लोक-भाषे च्या कैवारी असणे स्‌वाभावीक च आहे (भ. ३५)। पण नाथां नी नीरभीमान-वृत्ती राखून जो त्‌र्‌ ने लोक-भाषे ची प्‌रतीष्‌ठा सीद्‌ध केली तो त तें ची वीशेषता आहे। नाथां नी भागवत मराठी त आणले, हे तें च्‌चे काम तो वेळ चा शास्‌त्‌री-पंडीतां ना, प्‌रत्‌यक्‌ष नाथां चा वीद्‌वान् मुला ला ही, आक्षेपार्‌ह वाटले। तो वर नाथां नी काय केले? नाथां नी तो भागवता चे तयार झालेले अध्‌याय तो आक्षेपकां चा च हाती सोपवीले आणी म्हटले: जर मूळा तील अर्‌था ला काही न्‌यून-नता आली असेल अथवा भाव-गौरवा ची हानी झाली असेल तर आपण हे लीखाण गंगे त अर्‌पण करू शकता। या तीं चा वागणो त तें च्‌या आत्‌मवीश्‌वास, तें ची नम्‌रता, आणी समोर चा माणसा चे हृदय जींकून घेणो ची सत्‌याग्‌रही पद्‌धती, दीसून येते। पंडीतां नी काय केले? अेके ठीकाणी काडी घालून तेवढा भाग वाचून पाहीला। तें ना तो त दूषण देणो सारखे काही दीसले नाही। दीसले असते तर तो ग्‌रंथ तीथे च टाकाऊ झाला असता। कारण तें ची परीक्षणा ची रीत च अशी होती की अेका काडी त नीघालेला भाग नापास ठरला की सबंध ग्‌रंथ नापास ठराय्‌चा। आणी अेक काडी त पास ठरला तर आणखी दहा-पांच ठीकाणी काडो घालून बघाय्‌चा। नापास करणे अशक्‌य झाले तर च ग्‌रंथ पास कराय्‌चा। पंडीतां नी ग्‌रंथ पास केला म्हणजे तो ला काळा ची भीती उरली च नाही। नाथां चा ग्‌रंथ तो गुणदोष-वीचक्षण पंडीतां नी चारी बाजूं नी कसोटी ने चाळून काल-नीर्‌भय ठरवून आदर-पूर्‌वक लोक-गंगे त सोडून दीला। गुण-द्‌न्‌य पुरुषा ला गुण-द्‌न्‌यान टाळता येत नाही। संस्‌कृता तील धर्‌म-ग्‌रंथ प्‌राकृत भाषे त आणणे अधर्‌मा चे आहे असा पंडीतां चा आक्षेप दीसत नाही। तसा आक्षेप तें ना घेणे ही शक्‌य राहीले न्‌व्हते। कारण द्‌न्‌यानदेवां ने आपल्‌या दीव्‌य सामर्‌थ्‌या ने तो चे केव्‌हा च नीराकरण करून ठेवले होते। पंडीतां ची शंका मराठी भाषे चो शक्‌ती

संबंधा न' ही तीतकी शी नसावी। कारण ती ही शकती दनयानद'वा न' दाखवून दीली होती। पण तीं ची शंका नाथां चव योगयत' वीषयीं दीसत'। तशी शंका घ'णव :चा तीं :चा अधीकार, आणी ती नीवारण करणव :च' आपल' करतवय, नाथां नी मानल'। लोक-भाषा समृदध :झालव शीवाय आणी तीला नीरवीवाद मानयता मीळालव शीवाय लोक-जीवन अननत होण' शकय नसलव मुळ' नाथां नी लोक-भाष' साठी अ'वढ' सायास क'ल'। दनयानद'वां नी :जरी ह' :च कारय पूरवी क'ल' होत', तरी तीं चव वयकतीतवा :च' अलौकीक त'ज 'बालपणीं :च सरवदनयता वरी तयात'' या तीं चव :च वरणना परमाण' बाळ-पणीं :च परगट :झालव मुळ' त' कारय तीं चव वयकतीगत गौरवा :च' ठरणार' होत', मराठी भाष' चव गौरवा :च' तीतक' स' ठरणार' न'वत'।

लोक-भाष' साठी नाथां नी दुसरी महततवा ची जी गोषट क'ली ती 'दनयान'शवरी :च' संशोधन'। नवीन द'अूळ बांधणव प'कषा ही पराचीन द'वळा चव जीरणोदधारा :च' पुणय मोठ' मानल' :जात' त' अगदी यथारथ :च आह'। दनयानद'व हा मराठी जनत' साठी द'वा न' पाठवील'ला नीरोपव होता, ह' नाथां नी ओळखल' होत'। तीं :चा तो नीरोप परीशुदध सवरूपा त, काही भ'सळ न होता :जसा :चा तसा, नीखळ रूपा त लोकां ना मीळत राहील अशी सोय क'लव न' जनत' :च' :ज' कलयाण साधणार' होत' त' कोणता ही नवीन गरंथ लीहीणव न' साधणार' न'वत'। दनयाद'वा पासून नाथां चव काळा परयंत तीनश' वरषां :चा अवधी लोटला। त'वढव त मूळ ची दनयान'शवरी ओळखू न य'णव अीतक' वीकृत रूप लोकां नी दनयान'शवरी :च' करून ठ'वल' होत'। तव :च' शोधन करणव त नाथां ना भागवत-ल'खना प'कषा ही अधीक परीशरम पडला। तव मुळ' तरासून :जाअून कषमाशील आणी शांती-जलधी अशा नाथां नी दनया-न'शवरी चव पाठा त अीतअुततर भ'सळ क'ली :जाअू नय', 'मणून अशी भ'सळ करू पाहणारा स अहींसक भाष' त शाप द'अून ठ'वला आह'।

(अी) हरी-भावन॑ न॑ जन-स॑वा करणारॅ स॑वका ला लोकाँ चॅ जीॅवना चीॅ घडण :चाळवण॑ सहसा आवडत नाहीॅ । :चालत असताना वाट॑ वर अ॑खादा कीडा पडला असला तरीॅ अहीँसक पउरउष हळ्द :च पाअ्दल माग॑ फीरवद्न वळण घ॑अद्न पउढ॑ :जातो । कारण, नाहीॅ तर नी.जल॑लॅ तॅ स्वामीॅ चीॅ :झोप मोड॑ल. तॅ चॅ 'रचल॑पणा' ला धक्का लाग॑ल, अशीॅ तॅ ला धास्तीॅ वाटत॑, अस॑ द्न्यानद॑वा न॑ वर्णील॑ आह॑ । अ॑खादॅ कीडॅ चॅ वीषयीॅ :जर अ॑वढीॅ काळजीॅ, तर मानव-समाजा शीॅ वागताना कीतीॅ काळजीॅ घॅयला पाहीज॑ ? 'मणद्न समाज-रचन॑ त सहसा हात घाल्द नय॑ । व्यक्तीँ चॅ मनो-रचन॑ त फरक घडवीॅत घडवीॅत समाज-रचन॑ त अशा कउशलत॑ न॑ फरक घडवद्न आणावा कीॅ तो कोणा स अ॑काअ॑कीॅ कळ्द ही नय॑ आणी तीकड॑ समाज पार पालटद्न :जावा, अशीॅ थोर सउधारकाँ चीॅ करणीॅ असत॑ । आ:ज :जो अउठला तो आपलॅ जीॅवना त काडीॅ :चा ही फरक न करता सबँध ब्रह्मांड-रचना पालटद्न टाकणॅ चीॅ भाषा बोल्द लागला आह॑ । अशा मनो-व्रुत्तीॅ ला थोर सउधारकाँ चॅ या करणीॅ :च॑ आकलन होणार नाहीॅ । पण सउधारका चॅ जाद्द चीॅ सारीॅ खउबीॅ अनाक्रमणशीॅल आक्रमणा त असत॑ । नाथाँ चॅ जीॅवना त आणी साहीत्या त ह॑ पहावयास सापडत॑ । अ॑र॑वीॅ अँत्यजा :च॑ पोर कड॑ वर घ॑ण॑, श्राद्धा :च॑ अन्न ब्राह्मणाँ चॅ आधीॅ महाराँ ना द॑ण॑, अीत्यादी गोष्टीॅ जॅ तीॅ नीॅ क॑लॅ तॅ तीॅ चॅ काळा कड॑ पाहता समाजा ला असामान्य धक्का द॑णारॅ होतॅ । तथापी तसा धक्का द॑त असता ही धक्का द॑त असलॅ :चा भास तीॅ नीॅ होअ्द दीला नाहीॅ । क॑वळ भद्त-दय॑ न॑ प्र॑रीत होअद्न :ज॑ करण॑ योग्य त॑ :च क॑ल॑ :जात आह॑, असा गउणोत्कर्षा :चा ठसा अउमटवीला । या त :च नाथाँ :च॑ नाथपण आह॑ । मोरोपँता प्रमाण॑ सार॑ लोक ह॑ :च 'मणत राहील॑ कीॅ

बा अ॑कनाथा दयाळ्द त त्द थोर, दीॅना जनाँ :चा ची भारीॅ तउला घोर ।
त्वाँ अँत्यजा च॑ कड॑ घ॑तल॑ पोर, तारीॅ :जस॑ कोटी त॑सा ची हा मोर ॥

तर दृष्टी ने सर्वतः सबंध जन्म-भर मूर्ती-पूजा करीत राहून ही मूर्ती-पूजे तील दोषां च्या नीषेध तो नी कसा आत्मीयते चा इक्का ने केला आहे (भ० २४ ते २७), तसे च समाजा तील अुच्च-नीच-भाव काढून टाकणा वीषयी तो नी समाजा ला कसे वीनवील आहे (भ० ६१ ते ६३), हे पाहणा सारखे आहे ।

(अी) नीरंतर भगवद्-भावने ने वर्तणारा पुरुष हा अेक परी शुद्ध परीस च समजला पाहीजे । 'मणजे तो च्या स्पर्श असलेला वातावरणा त लोखंडा च्या गंध ही अुरू नये, सारे सोने च होअून जावे, अशी अपेक्षा राहील । परीसा चा अुपमे अैवजी चंदना ची आणी वैरागर मणा ची अुपमा घेअून नाथां नी ही च अपेक्षा व्यक्त केली आहे । तू चंदन आहेस आणी तुझा सर्वांगी सुवास आहे, तर तो सुवास गप्प कसा राहील ? सभोवताल चे तरु तुझा सहवासा ने चंदन कसे होणार नाहीत ? तू जर वैरागर-मणी आहेस आणी तेजा ने परीपूर्ण आहेस तर सभोवती चे हरळ (गार-गोटे) तुझा स्पर्शा ने हीरे कसे होणार नाहीत ? अनुभवी गुरू पासून दृष्टी लाभलेला अेकनाथ 'मणतो—"तू जर पूर्ण संसीद्ध झाला आहेस, तर तुझा संन्नीधी त येणारा कोणी ही तुझा सारखा कसा होणार नाही ?" हा मी १४० वा भजना च्या अर्थ- गद्या त वीवरला आहे । ही शुद्ध सत्यागरही नीष्ठा आहे । भगवद्-भावने ने भक्तां ची सेवा करू पाहणारा कोणी या नीष्ठे च्या अस्वीकार करू शकत नाही, या हून वेगळी कल्पना करू शकत नाही । सत्यागरह-शास्तरा ला पराजय माहीत नाही, असे गांधीजी 'मणत । तो च आशय १३९ वा भजना त आलंकारीक भाषे त नाथां नी मांडला आहे । "संत हे फार मोठे घातकी आहेत, तो च्या घात करू शकणारा आजवर कोणी भेटला नाही । तो नी नीज-बोधा च्या फास घालून, अुभा आणी आडवा गंधा चे दोघे गोसावी, काम आणी क्रोध, मारून टाकले । तो नी सर्वां च्या नीःपात करणा च्या अुद्योग आरंभीला । आपला चारी बाजूं चे

चारी गाव तीं नी भर दीवसा ज्याळून टाकलें" असें नाथां नी तीं च कौतुक केलें आहे। अींद्रा चा पराक्रमा चें वेदा मधें असें च वर्णन शतशः आलें आहे। शेवटीं या रूपक-शैली चें पांघरूण फेकून देअून अेकदा अृषी नें साधा भाषें त सत्य सरळ सांगून टाकलें :

मायेत्‌ सा ते यानी युद्धानी आहुः

नाद्य शत्रुं न नु पुरा वीवीत्से ।

" हे अींद्रा, तुझीं युद्धें-युद्धें 'मणून जीं 'मटलीं गेलीं, ती केवळ माया च होती। तुला आज ही कोणी शत्रु नाही, आणी मागें ही कोणी न'वता।" 'सूर्या वर अंधकार हल्ला करतो आणी सूर्य आपला सहस्र कीरणां नी अंधकारा चें वीदारण करतो।' या चा अर्थ अीतका च की सूर्या पुढें अंधार तोंड दाखवीत नाही, सूर्या ला अंधार माहीत नाही। सूर्य नसणें 'मणजे च अंधार असणें। पूर्ण अहींसे मधें सहज च वैर-त्याग होतो, वैर अुरत नाही, असें पतंजली 'मणतो। परीपूर्ण भगवद्-भावनें समोर दुर्जनता दर्शन च देत नाही, असें नाथ 'मणतात। अींद्रा ला वैर माहीत च नाही, असें वेद 'मणतो। सत्याग्रह-शस्त्रा ला पराजय माहीत नाही, असें गांधीजी 'मणतात। या सर्वा चा अर्थ अेक च आहे।

हरी-भावनें नें भारलेला पूर्णात्मा सारें वीश्व आत्मसात्‌ करील, त्या ला आपलें च रूप देअील, या सीद्धांता तून अेक प्रती-सीद्धांत असा ही नीघतो की देहा चा अुपाधी त असताना कोणी ही पूर्णात्मा होअू शकत नाही। अर्थात्‌ अुंचातलें अुंच महात्मे ही अपूर्ण असणार, आणी तीं चा अपूर्णतें चा माना नें दुर्जनां ची तीं चा शी कमी-अधीक गाठ पडणार। आणी साहजीक च मग दुर्जना चा प्रतीकारा चा ही प्रश्न अुठणार। तो सोडवाय चा कसा ? या च सत्याग्रही नीष्ठें चा वीनीयोग करून तो सोडवाय चा। दुर्जनां चा प्रतीकार 'मणजे दुर्जनतें चा प्रतीकार।

'मणज॑ :च बाह॑र दीसून पडणारू दुर्‌जनत॑ :चा नीज-हृदया त शोध। ह॑ समीकरण-सूत्‌र पक्‌क॑ :झाल॑ 'मणज॑ क्‌षमाशील वृत्‌ती, क्‌ल॑श-सहन, अुदार भाव, नीरह॑कार वृत्‌ती, नम्‌रता, अक्‌षोभ्‌य शांती, मोकळ॑ हृदय, यत्‌न-सातत्‌य, फल-त्‌याग हा :च प्‌रतीकारा :चा मार्‌ग ठरतो। आणी अीश्‌वर-भक्‌ता ची न॑हमी ची जीवन-पद्‌धती ही :च असत॑। अशा रीती न॑ नीत्‌या ची जीवन-पद्‌धती आणी प्‌रासंगीक प्‌रतीकार-पद्‌धती, दोनी अ॑करूप :च होअून :जातात। असा वीचार क॑ला 'मणज॑ लक्‌षा त य॑त॑ की सत्‌याग्‌रह ही वस्‌तुतः अ॑क जीवन-पद्‌धती :च आह॑। ओघा न॑ अथवा आपाततः :च ती:च॑ प्‌रतीकार-पद्‌धती त रूपांतर झालू :चा परीस्‌थीती मुळ॑ आभास होतो। मी ह॑ नीट मांडू शकलो की नाही,मला सांगता य॑त नाही। सत्‌याग्‌रह-वीचार श॑वटी अद्‌वैता त मीसळून अीतका सूक्‌ष्‌म बनतो की तो शब्‌दा न॑ व्‌यक्‌त करण॑ कठीण :च आह॑।

सत्‌याग्‌रहा ची अैतीहासीक काळा तील आदर्‌श अुदाहरण॑ 'मणून आपण जी आठवतो, तू त अ॑कनाथां :च॑ अुदाहरण आह॑। दुर्‌जना न॑ अंगा वर थुंकत :जाव॑ आणी नाथां नी पुनः पुनः स्‌नान करीत :जाव॑, ही अ॑खादी कल्‌पीत कहाणी नाही। नाथ-कालीन सत्‌ताधीश वर्‌गा चू मदांधत॑ ची नीदर्‌शक अशी ती अैतीहासीक घटना आह॑। मला वाटत॑,सत्‌याग्‌रहा :च॑ या हून :चांगल॑ अुदाहरण दाखवीण॑ कठीण आह॑। य॑शू ख्‌रीस्‌ता चू आणी ख्‌रीस्‌त-पूर्‌व चीनी तत्‌त्‌वद्‌न्‌य लाओत्‌स॑ यां नी दील॑लू नीर्‌वैरत॑ चू शीकवणुकी :चा अुल्‌ल॑ख करून टीळकां नी गीता-रहस्‌या त "आमचू महाराष्‌ट्‌र-साधु-मंडळा त तर अ॑कनाथ महारा:जा सारखॆ नी या प्‌रमाण॑ आचरण क॑लू चू कथा ही आह॑त।" असा नाथां चू या अुदाहरणा :चा अभीमान-पूर्‌वक अुल्‌ल॑ख क॑ला आह॑, तो सर्‌वथा योग्‌य :च आह॑।

या बाबती त ओघा न॑ अ॑का गोष्‌टी :चा खुलासा करण॑ :जरूर आह॑। "अ॑का गाला वर मारल॑ असता दुसरा गाल पुढ॑ कर" ही

ख्रीस्ता ची शीकवण अथवा नाथां ची वरील वागणूक ही, अप्रती-कार-सूचक आहे, आणी गांधीजीं ची शीकवण अहींसात्मक पण प्रती-कारा ची आहे असा एक श्लेष मंडळी काढीत असतात। मला हा श्लेष चुकी चा वाटतो। शाब्दीक श्लेष च पहाय चा तर ख्रीस्ता च्या वाक्या त ही प्रतीकार दीसून पडणारा आहे। "तुझ्या गाला वर मारले असता तीकडे तू लक्ष देऊ नको" अथवा "तू स्वस्थ रहा" असे त्या चे वाक्य नाही। "दुसरा गाल पुढे कर" असे वाक्य आहे। ज्यां ना प्रतीकार-शब्दा वीषयी प्रीती जडली असेल त्यां चे या त समाधान होण्या सारखे आहे। पण माझ्या दृष्टी ने हे समाधान आणी तो श्लेष दोन्ही कुचकामाचे आहेत। परीपूर्ण नीर्भय आणी नीर्वैर पुरुषा ची सहज वागणूक, मग ती चे स्वरूप सक्रीयते चे असो, नीष्क्रीयते चे असो, प्रतीक्रीये चे असो, अनेकरूप च असते। दुर्जन अंगा वर थुंकला असता एखादा नीर्वैर पुरुष आपण आपल्या अंगा वर थुंकून घेईल, दुसरा नीर्वैर पुरुष काही च न करता हास्य-मुद्रे ने पुढे चालू लागेल, तीसरा नीर्वैर पुरुष नाथा प्र-माणे प्रतीक्रीयारूप स्नान करील, चौथा नीर्वैर पुरुष प्रसन्न वदना ने आणी आत्मीय भावने ने समोर च्या चे कान धरणारा कल्पीता येईल। परंतु गांधीजीं च्या अहींसे ची अथवा सत्याग्रहा ची अशी वीशेषता सांगता येईल की गांधीजीं नी त्या कल्पने चा सामुदायीक प्रयोग केला। नाथादीकां चा तो व्यक्तीगत प्रयोग होता। हा भेद खरा आहे। पण तो ही बराचसा परीस्थीती च्या कारणा ने झालेला आहे। त्या त्या काळा ची एक आवश्यकता आणी एक शक्यता असते। तदनुकूल च त्या त्या काळच्या महापुरुषां ना ही सुचत असते। शीवाय वीश्व-व्यापक वीशीष्ट शक्तीं चे ही प्रयोग आधी व्यक्तीगत क्षेत्रा त होऊन तेथून कसोटी स उतरल्या नंतर पुढे सामुदायीक घडाय चे अशी च वीज्ञान-पद्धती आहे। वैज्ञानीकां चे सार-प्रयोग आधी लॅबोरेटरी त साधाय चे आणी मग जगा त पसराय चे।

लॅबोरेटरी तील अनुभवां चे आधारा ने च ते जगा त जावू शका-य चे। अशा सरणी त अडचण काही च राहत नाही; व्यापक वीनीयोग करताना व्यावहारीक मर्यादा काय लागू होतील ते वढे सांभाळले 'मणजे झाले । पृष्ठ-भूमीती तील बहुतेक सारे सीद्धांत बींदू अेवजी रेषा, रेषे अेवजी पृष्ठ, अशा फरका ने जसे घन-भूमीती त सहज लागू होतात, तसे च येथे ही आहे । 'मणून व्यक्तीगत आणी सामूहीक परयोगा त तत्त्वतः काही फरक मानणे ची गरज नाही । परीस्थीती-भेदा मुळे सामुदायीक परतीकारा ची कल्पना सुचणे नाथां ना शक्य न'वते। ती ना तसे कोणी थोदून च वीचा-रले असते तर समाज-संरक्षणा साठी क्षात्र धर्मा स मान्यता देअून ही ते मोकळे झाले असते, असा ही संभव आहे । कींबहुना अेकदा जनार्दन स्वामी ध्यान-मग्न असताना, आलेले पर-चक्र नाथां नी स्वतः घोडे वर बसून परतवले ची ही गोष्ट सांगीतली जाते । या गोष्टी ला तसे फार महत्त्व देणे ची गरज नाही । कारण, ते नाथां चे नीज-चरीत्र नसून नाथ-कालीन कर्तव्य-नीष्ठ नागरीका चे चरीत्र आहे। नाथां चे चरीत्र ती चे सत्याग्रहा त आहे; तेवढे च लोकां नी आणी टीळकां सारखे नी ही लक्षा त ठेवले आहे।

(अु) सत्याग्रह-शब्द नाथां ना माहीत न'वता । पण ती चे संबंध जीवना त आणी मनो-रचने त ती वस्तु मुरलेली होती, हे लक्षा त घेतले 'मणजे—"आपुली च दारा । जरी टेके व्यभीचारा । क्रोधा चा थारा । अंतरी न ये" अीत्यादी आत्यंतीक शांती ची जी ती नी वर्णने केली आहेत (भ. १४७), ते त नवल वाटणे चे कारण नाही । सगळे च संत शांत असतात । तथापी संत-मंडळा त ही नाथां ची शांती कर्णा चे अुदारते परमाणे वीश्र्यात आणी 'मण वजा झाली आहे । दुन्यानदेवां ना अेकदा राग आला आणी ते बद्दल 'ताटी अुघडा दुन्यानेश्वरा' 'मणून मुक्ताबाअी चा ती ना मार खावा लागला । हे पाहता शांती चा अुत्कर्ष साधणे त

नाथा सारखे नाथ :च होते, असे 'मणावे लागते। या बाबती त तीं नी आपला अनुभव अेके टीकाणीं दोन-चार शब्दां त :च अशा मार्मीक रीती ने मांडला आहे की तो कोणा ही साधका :चे लक्ष वेधल्या शीवाय राहणार नाही । ते 'मणतात, "देहीं वाढे :जों :जों शांती तों तों वीरक्ती आंगीं बाणे– अैसा आहे अनुभव......" वैराग्यशील माणसा त काही अेक प्रकार ची कटुता असते अशी सार्वत्रीक कल्पना आहे । त्या च्या नेमके उलट हे नाथां :चे कथन आहे । वीरक्ती आणी शांती हे तीं नी पर्याय :च केले आहेत । ही :च खरी आणी समग्र दृष्टी आहे । अेर'वी लोक-कल्पने नुसार 'नुसते वैराग्य हे काड पीसे' ठरून त्या च्या मदती ला, 'मणजे त्या तील दोषां च्या नीवारणा साठी वीवेका ची :जोड त्या ला देअून वीचारा ची पूर्णता करावी लागते । ही सारी भानगड नाथां नी आपल्या अनुभवा च्या बळा ने कापून टाकली आहे । :जो वैराग्य-गुणा ने साधका :चा कर्म-योग, ध्यान-योग, आणी चींतन-योग सफल 'वाय:चा, तो स्वतः :च लुळा पांगळा आणी बावळा कल्पून घेतला तर साधका ला आशा :च काय राहीली ? 'मणून नाथां नी अगदी योग्य-मार्ग-दर्शन केले आहे । त्या :चा आ'मा साधकां ना कधी ही वीसर न पडो ।

नाथां :चे हे असे वीवीध-दर्शन तीं च्या या नीवडक अभंगां त पाहून घेण्या सारखे आहे ।

# ७. कीर्‌तन-भक्ती

हरीजन-सेवा, जन-सेवा, आणी यथासंभव सर्‌व-भूत-सेवा हे मानवा ंचे जीवीत-कर्‌तव्‌य आणी ते ंच त्‍या ंचा मोठा यद्‌न्‌य, या कल्‌पने मुळे आम्ही आज ंचे परमार्‌थ-साधक अुभे आहोत। पण ही कल्‌पना अृग्‌वेदा त ही स्‌पष्‌ट नीर्‌देशीली आणी आदेशीली आहे। अेक ंच मंत्‌र येथे देतो :

स्‌वादुष-क्‌षद्‌मा यो वसतौ स्‌योनकृत्‌
जीव-याजं यजते सोपमा दीवः।

'घरी आलेल्‍या माणसाला ंजो गोड करून घालतो, आणी त्‍या च्‍या राहण्‍या ची ंजो सुखकर सोय करतो, तो जीवन-यद्‌न्‌य यजतो। तो या भूमी वर स्‌वर्‌ग ंच आणतो।' असा या मंत्‌रा ंचा भावार्‌थ आहे। यद्‌न्‌य-कल्‌पना गीते ने वीस्‌तारीली आणी संशोधीली असे आपण म्हणतो। पण ते सारे संशोधन गीते ंचे स्‌व-कल्‌पीत नाही। वेद-मूलक ंच आहे।

पण मंत्‌रा शीवाय यद्‌न्‌य नाही। आणी म्हणून प्‌राणी-सेवा-रूप जीव-यद्‌न्‌य यजू अीच्‌छीणार्‍या सेवकां ना मूल-भूत मंत्‌रा ंचे नीरंतर चींतन-मनन होत राहीले पाहीजे। माझ्‍या हे लक्‌षा त आले आहे की आमच्‍या बर्‍या ंच शा कार्‌यकर्‌त्‍यां ना या गोष्‌टी ंचा वीसर पडतो। ते आपली कामे करीत ंच ंजातात। अर्‌थात्‌ हा तर गुण ंच आहे। पण चींतना ला वेळ नाही म्हणतात। कोणी कोणी तर चींतना ची गरंज ही नाही म्हणतात। आणी कोणी म्हणतात, कामा मुळे चींतन सुचत ंच नाही। पहीले कर्‌म-भार-वाही, दुसरे कर्‌म-वादी, आणी तीसरे कर्‌म-जड। तीघे आपण करीत असलेल्‍या कामा ला आपण ंच छेदून टाकीत असतात, पण त्‍या ंचे त्‍यां ना भान ही

नसतें। अशा च्या कर्म-शक्ती ला ज्ञानदेवां नी आंधळ्या गरुडा च्या पंखा ची अुपमा दीली आहे । गरुडा च्या पंखा ची ताकद, त्या ची झेंप, त्या ची भरारी, सारें च अनुपम । पण त्या ला नीरालंब आकाशा तून मार्ग कापायचा असतो । तशा स्थीती त डोळ्या वाचून बाहेर येतो । पण डोळ्या वाचून तो काय करू शकणार ? अफाट कर्म-क्षेत्रा त ज्यां ना वापरायचें आहे त्यांचें दृष्टी वांचून कसें चालणार ? म्हणून जीवना च्या मूल-भूत वीचारां चें चींतन कर्म करीत असताना, करण्या पूर्वी, आणी केल्या नंतर, ती'नी काळीं चालू असलें पाहीजे । कर्म करीत असताना, आणी कर्म करीत नसता, दो'नी अवस्थां त तें होत राहीलें पाहीजे। वीचारां चें पाठबळ नसलेलें कर्म म्हणजे पाण्या च्या बाहेर काढलेली होडी च आहे । तीला ओढून फरफटत तरी न्यायची, कींवा पडून तरी ठेवायची । म्हणून तत्त्व-वीचारा चा सतत पुरवठा होत राहणें सेवामय जीवना च्या फार हीता चें आहे ।

हे आमच्या भक्ती-मार्गी संत मंडळीं नी चांगलें ओळखलें होतें । त्यांतले काही कर्म सोडून बसले होते । त्यांचा वीचार आपण सोडून देअू । पण जे कर्म आचरीत होते ते ही नेहमी नाम-संकीर्तन आणी वीचार-संकीर्तन करीत असत । त्या साठी कीर्तन-भक्ती हा अेक भक्ती चा प्रकार च त्यां नी मानला होता । नारदा सारख्यां नी तो खूप च चालवीला । नारदां ची तर

‘ श्रीमुक्ती-बहु-साधनें तदीतरें गणी ना च तो
सुजनीं वर-वल्लकी तव सभांगणीं नाचतो ।’

अीथ पर्यंत मजल होती । ज्ञानदेवां नी ही हा च वीचार असा च फुलवून मांडला आहे (ज्ञानेश्वरी : गीता ९.१४ वरील ओव्या १९७ ते २११— भीडे संपादीत, ढवळे प्रकाशीत) कींबहुना ज्ञानेश्वरी ला च त्यां नी धर्म-कीर्तन असें नाव दीलें आहे । नामदेव नाथ आणी तुकोबा तीघे ही तीला, आअी ला जशी

मऊले तसे चीकटून राहीले आहेत। अीश्वराच्या महीमा गाताना या मंडळींना कंटाळाच येत नाही। कीर्तनाने वक्ता आणी श्रोता दोघे पावन होतात (भ. ११८)। पशु पक्षी पावन होतात (भ. ११७)। चराचर पावन होतात (भ. १२०)। असे हरी-कथेचे गौरव गाअीले गेले आहे। नाथांनी तर कीर्तनकारांची अेक संस्थाच बनवीलेली दीसते। कारण कीर्तनकारांसाठी त्यांनी नीयम घालून दीले आहेत (भ. १२५), आणी वीषय ही सुचवीले आहेत (भ. १२६)। भक्ती-मार्गातील हा कीर्तन-भक्तीचा वीशेष द्न्यान-मार्गात व्याख्यान—प्रवचन—भाषणादी रूपात दीसून पडतो। या दोन्ही मार्गांत त्याची जीतकी गरज आहे त्याहून लोक-सेवेच्या मार्गात ती कमी नाही। अुलट जास्त आहे। कारण, द्न्यानाची आणी भक्तीची सारी चर्चा तर कर्म-योगाला लागतेच। त्या शीवाय सेवेच्या ही अनेक वीषयांचे कीर्तन, त्यात हवे असते।

कीर्तनकार आणी प्रवचनकार हे दोन्ही पैलू नाथांच्या जीवनात होते। त्यांची छाया या अभंगांत चांगली अुमटली आहे। दोन स्वतंत्र प्रकरणेच त्यासाठी येथे आली आहेत।

वाचनालय

# ८. नाथ-पूर्व-कालीन वीचार-वीकास

नाथां ची नीवडक गाथा, अुपदेशपर आणी अनुभवपर दोन्ही, अीतकी सुबोध-भाषे त अुतरली आहे की ती समजणे ला बाहेर चे मदती ची काही च गरज नाही । तथापी नाथ-पूर्व-कालीन वीचार वीकासा चा परीचय असल्यास तें चे नीजानुभवा चे आणी साक्षात्कारा चे जे अुद्गार आहेत ते अधीक अुलून दीसतात । वीशेषतः नाथां चे चींतना वर ज्यें चा वीशेष परीणाम झाला आहे तें चा परीचय असणे नाथां चे मनोगत नीट अुकलणे ला अुपयोगा चे आहे ।

प्राचीन काळी वैदीक, श्रमण, आणी बौद्ध वीचारां चे लाटा अेका मागून अेक अुत्तर भारता तून दक्षीण भारता त वाहत गेले । तें चे वेगा ने राज्ये मोडकळली आणी रचली, समाज पालटले, जाती अुसळले आणी मीसळले, नवे भाषा आणी नवे रीती-रीवाज अुदया स आले। ते नंतर मध्ययुगा त वीचारां चे अशा च लाटा दक्षीणे तून अुत्तरे कडे अुलट वहात गेले ।या सारे तत्त्वज्ञाना चे आणी अुपासने चे होते । शंकर, रामानुज, मध्व, ज्ञानदेव, वल्लभ असे पाच आचार्य, अेका मागून अेक अनुक्रमे, केरळ, तमीळनाड, कर्नाटक, महाराष्ट्र आणी आंध्र या भीन्न भीन्न भाषा बोलणारे प्रदेशां त अवतरले । पैकी ज्ञानदेवा ने आपले सर्व साहीत्य आपले प्रांता चे लोक-भाषे त रचले। अीतरां नी ते वेळची मानलेली राष्ट्र भाषा जी संस्कृत ती चा आश्रय केला । रामानुजां नी तमीळ मधे थोडे से लीहीले आहे, परंतु ते नगण्य आहे । यां तील शंकर आणी ज्ञानदेव या दोहीं चा ठसा नाथां चे अंतर्मना वर खोल अुमटलेला आहे ।

नाथांची द्न्यानदेवा शी अीतकी अेकरूपता आहे की द्न्यान-देवा ला वगळून तींची पृथक कल्पना ही करता येत नाही। द्न्यान-देवा :चे द्न्यानोत्तर भक्ती :चे तत्त्वद्न्यान नाथांनी अक्षरशः अुचलले। पण भक्ती :चे स्वरूप सोपे करून तींनी सामान्य जनांचे आटोक्या त आणून सोडले। गुरु-भक्ती, समाजा त सद्गुण वाढावे या वीषयींची चींता, दोघां ची सारखी :च दीसून येते। दोघांनी कृष्णभक्ती :चा आश्रय केला, आणी दोघांनी मीळून कृष्णा ने आपल्या दोन शीष्यांना केलेले प्रबोध जनते पर्यंत पोःचवीले।

द्न्यानदेव कपीला प्रमाणे जन्म-सीद्ध पुरुष होते। नाथ क्रमा क्रमा ने वीकास पावणारे गृहस्थाश्रमी होते। असा तींचे त मोठा फरक असला तरी नाथां :चे आराध्य दैवत नीःसंशय द्न्यान-देव :च होते। दोघांचे बाह्य जीवनाकारा त फरक दीसला तरी आंत-रीक चींतन समान। द्न्यानदेवा ने स्वतंत्र प्रतीभे ने वीचार मांडावा, नाथांनी 'पराधीनपणे' ते वीवरावे, असे तींचे नाते होते। नामदेव हे द्न्यानदेवा :चे प्रचारक होते, आणी नाथ वीवरणकार। दीसायला तींनी वीवरण भागवता :चे केले आहे, पण ते आपोआप :च द्न्यानेश्वरी :चे वीवरण झाले आहे। हा मुद्दा सर्व-मान्य असल्या मुळे अधीक वीस्तरीत नाही। नाथांचे भजनां तील अेक-दोन स्थळे पाहून घेअू 'मणजे पुरे होअील।

'पूज्यता डोळां न देखावी, स्व-कीर्ती कानीं नायकावी
हा अमुका अैसी नोहावी, से ची लोकां ॥'

अीत्यादी गीता १३-७ मधील अमानीत्वा वरील द्न्यानदेवांचे व्याख्याना शी १४५ वा अभंग तोलून पहावा। तसे :च १७० वे अभंगा तील—

अनन्य आवडी :चे जळ। प्रक्षाळीले चरण-कमल।
वासना समूळ। चंदन लावी॥

हा चरण द्न्यानेश्वरी चे पंधरावे अध्याया तील प्रस्तावने तील

अननत्योदक' धउवट, वासना ज' तनत्नीषरठ
त' लावील'स' बोट, च'ंदना :च'

या ओवी :च' रूपांतर आह' । या अभंगा तील गउरउ-पूज' :च' सबंध रूपक दनत्यानद'वा चत रूपका शी तउलत्य आह' ।

'ततत्सदीती अ'स' प'ल वसत्तू वरी
गीत' माजी हरी बोलीय'ल''

हा अउघड :च दनत्यान'शत्वरी १७-३६९ :चा अउलल'ख आह'।

मोकत्ष द'अूनी अउदार । काशी होय कीर ।
परी व':चण' लाग' शरीर । तीय' गांवी ॥

ह' दनत्यानद'वा न' क'ल'ल' भकत्ता :च' शउचीतत्वा :च' गौरव अभंग १३८ मध' :जस' चत तस' अउपलबत्ध आह' । अशी अन'क अउदा-हरण' द'ता य'तील, पण तत चरी गरज नाही ।

दनत्यानद'वां :चा आणी नाथां :चा संबंध लोक-वीदीत :च आह'। पण तत चत जीवना वर शंकराचारत्यां :चा अउमटल'ला ठसा तीतका सा लोक-वीदीत नाही । शंकरां :चा अद्वैत-वीचार दनत्यानद'वां नी मानत्य क'ला । आणी तो :च ओघा न' नाथां चत पदरा त पडला, तशा अरत्था न' 'मणत नाही । पण नाथां :चा शंकराचारत्यां शी सरळ संबंध दीसतो। तत नी शंकराचारत्यां चत परकरण-गरंथा वर वीवरण' लीहीली आह'त तत वरून तर ह' दीसत' :च आह', पण शंकराचारत्यां चत जीवना तील अ'क अतत्यंत सार-भूत वसत्तउ नाथां नी तत चत पारूवन घ'तली आह', आणी त' अूण तत नी नमूद ही करून ठ'वल' आह' । भागवता चत आरंभी वत्यास वालत्मीकी अीतत्यादी संसत्कृत 'महाकवी' ना आणी दनत्यानद'व नामद'व अीतत्यादी पराकृत 'कवीशत्वरां' ना तत नी रीत-सर वंदन क'ल' आह' । तत बरोबर भागवत-वत्याखत्यान-कार शत्रीधर-सत्वामी, जत चत टीक' :चा आधार नाथां नी घ'तला आह', तत :च' वंदन क'ल' आह' । त' ही अप'कत्षीत :च आह' । पण भागवता शी

काहीच संबंध नसताना तरी नी शंकराचार्यांना ही वंदन केले आहे । ती ओवी अशी आहे :

वंदू आचार्य शंकरू । जो का ग्रंथार्थ-वीवेक-चतुरू ।
सारून कर्मठते चा वीचारू । प्रबोध-दीनकरू प्रकाशला ॥

या हून अधीक नेमके आणी अधीक समर्पक वर्णन शंकराचार्यां चे करता येणार नाही । हींदू-धर्मा ची वीवेक-शून्य जड कर्मठते तून शंकराचार्यांनी सुटका केली । या एका गोष्टी ने मुख्यतः नाथां च्या वर त्यां ची छाप आहे । नाथांनी १४२ व्या अभंगा त आपल्या स्वतः च्या अवतार-कार्या चे वर्णन केले आहे । तो अभंग म्हणजे नाथां चे आत्म-चरीत्र च आहे । 'आम्हां कां संसारा येणे?' असा प्रश्न करून त्या चे उत्तर जे नाथांनी दीले आहे त्या त महत्त्वा चे एक कारण असे सांगीतले आहे :

नाना मते पाखंड । कर्मठता अती बंड ।
तया चे ठेचणे तोंड । हरी-भजने ॥

असे शंकराचार्यां चे आणी त्यां चे स्वतः चे एक फार मोठे जीवन-कार्य समान दर्शवीले आहे । पण ते कार्य करण्या च्या दोहीं च्या पद्धती तील फरक ही त्या त सुचवीला आहे । शंकराचार्यांनी कर्मठते चे नीवारण तत्त्व-वीचारा ने केले आहे आणी नाथांना ते हरी-भजना ने करावयाचे होते । हा तत्त्व-द्न्यानी आणी सत्याग्रही भूमीके तील भेद आहे । बौद्ध वीचारा चे नीरसन हे शंकराचार्यां चे मुख्य कार्य पाश्चात्त्य अीतीहासकारांनी ठरवून टाकले आहे । पण ते अगदी च अनैतीहासीक असून त्यां चे वास्तवीक कार्य नाथांनी जे हेरले ते च आहे । शंकराचार्यां पासून आपले एक मोठे जीवन-कार्य च नाथांनी उचलले असल्या मुळे दोघां च्या ग्रंथां तील समान स्थळे बघत बसण्या त काही मोठे से तात्पर्य नाही । तथापी अभंगां तील एक स्थळ पाहून घेऊ :

मेघ वर्षे नीर्मळ जळ । परी जैसें बीज तैसें फळ
तैसे भक्त अभक्त दोन्ही । वेगळीक वेगळेपणीं
अेका जनार्दनी गूण । चंदन वेळू नेणे समान (भ. ९)

हें वाचून शांकरभाष्या तील 'अीश्वरस्तू पर्जन्यवत् द्रष्टव्यः।' अीत्यादी वीवेचन आठवल्या शीवाय रहात नाही ।

आसनीं शयनीं नीत्य हरी चें चींतन

## प्रकरण तीसरें

### सत्संगती आणी गुरु-भक्ती

### अध्याय १९

१२८

वैष्णवां घरीं देव सुखावला । बाहीर न वज़े दवडोनी घातला
देव म्हणे माझें पुरतसे कोड । संगती या गोड वैष्णवां ची
ज़री देव नेअुनी घातला दूरीं । परतोनी पाहे तंव घरा भीतरीं
कीर्तना ची देवा आवडी मोठी । अेका जनार्दनी पडली मीठी

१२९

संता-अंकीं देव बसे । देवा-अंकीं संत बैसे
अैसी परस्परें मीळणी । समुद्र तरंग तैसे दोन्ही
हेम-अलंकारवत । तैसे देव-भक्त भासत
पुष्पीं तो परीमळ असे । अेका जनार्दनी देव दीसे

१३०

संत आधीं देव मग । हा ची अुमग आणा मना
देव नीर्गुण संत सगुण । म्हणोनी महीमान देवा सी
मुळीं अलक्ष्य लक्षा नये । संतीं सोय दावीली
अेका जनार्दनी संत थोर । देव नीर्धार धाकुला

१३१

संतां च्या महीमा देव ची ज़ाणे । देवा चीं गोडीं संतां सीं पुसणें
अैसीं आवडीं अेकमेकां । परस्परें नोहे सुटीका
बहुत रंग अुदक अेक । या परीं देव संत दो'नीं देख
मागें पुढें नये कोणीं । शरण अेका जनार्दनीं

१३२

अभक्तां देव कंटाळतीं । परीं सरते करीतीं संत तीं
म्हणोनी महीमा तीं च्या जगीं । वागवीतीं अंगीं सामर्थ्य
मंत्रा-तंत्रा नोहे बळ । भक्ती प्रेमळ पाहीजे
आगम-निगमां च्या पसारा । अुगा ची भारा चींधीं च्या
वेद-शास्त्रां चीं घोकणीं । तीं तो कहाणीं ज़ुनाट
अेका जनार्दनीं सोपा मार्ग । संत-संग च्योखडा

१३३

संता सीं ज़ो नींदीं देवा सीं ज़ो वंदीं । तो नर आपदीं आपदा पावे
देवा सीं ज़ो नींदीं संता सीं ज़ो वंदीं । तो नर गोवींदीं सरता होय
कृष्णा कंस द्वेषीं नारदा सन्मानीं । सायुज्य-सदनीं पदवीं पावे
अेका जनार्दनीं गूज़ सांगे कानीं । रहा अनुदीनीं संत-संगें

अध्याय २०

१३४

मेघा परीस अुदार संत । मनोरथ पुरवीतीं
आलीया शरण मनें वाचा । च्यालवीतीं तीं च्या भार सर्व

लींगाड अुपाधी तोडीती । सरते करीती आपणां माजीं
शरण अेका जनार्दनी । तारीले जनीं मूढ सर्व

१३५

जया जैसा हेत । तैसा संत पुरवीती
अुदारपणें सम देणें । नाहीं अुणें कोणा सी
भलतीया भावें संत-सेवा । करीतां देवा माने ते
अेका जनार्दनी ता चा दास । पूर्ण वोरस कृपे चा

१३६

संतां चे ठाअीं नाहीं द्वैत-भाव । रंक आणी राव सारीखा ची
संतां चें देणें अरी-मीत्रां सम । कैवल्या चें धाम अुघडें तें
संतां ची थोरीव वैभव गौरव । न कळे अभीप्राव देवा सी तो
अेका जनार्दनी करी संत-सेवा । पर-ब्रह्म ठेवा प्राप्त झाला

१३७

संत माय-बाप 'मणतां । लाज वाटे बहु चीत्ता
माय बाप जन्म देती । संत चुकवीती जन्म-पंक्ती
माय-बापा परीस थोर । वेद-शास्त्रीं हा नीर्धार
शरण अेका जनार्दनी । संत शोभती मुकुट-मणी

१३८

जयाचेनी चरणें तीर्था तीर्थपण । तो हृदयीं केला सांठवण
नवल महीमा हरीदासा ची । तीर्थें अुपजती ता चे कुशीं
काशी-मरणें होय मुक्ती । येथें वचनें न मरतां मुक्ती
अेका जनार्दना चे भेटी । सकळ तीर्थें वोळंगती दीठी

## १३९

संत केवळ घातकी पाहीं । परी तयां सी पातक नाहीं
नीज-बोधा चे करुनी फांसे । दोघे गोसांवी मारीले कैसे
अती थाणोरीया कर्म करी । दीवसां जाळीले गांव चारी
अेका जनार्दनी घातकी मोठे । तां सी अंतक केवीं भेटे

## १४०

सर्वांगीं सुवास परी तो अुगला न राहे
सभोंवते तरु चंदन करीत चीं जाय
वैरागर मणी पूर्ण तेजा चा होय
सभोंवते हरळ हीरे करीत ची जाय
अेका जनार्दनी पूर्ण झालासे नीज
आपणा सारीखें परी तें करीतसे दुजें

## १४१

नीवृत्ती शोभे मुकुटाकार । द्न्यान सोपान वटेश्वर
वीठू पंढरी चे राणे । लीले भक्तां चीं भूषणें
गळा शोभे वैजयंती । तीसी मुक्ताअी म्हणती
अखंड शोभे माझा बापा । पदकीं तो नामा शींपा
कासे कसीला पीतांबर । तो हा ज़ाणावा कबीर
चरणीं वीट नीर्मळ । तो हा झाला चोखामेळ
चरणां तळील अूर्ध्व रेखा । झाला जनार्दन अेका

१४२

धर्मा ची वाट मोडे । अधर्मा ची शीग चढे
तैं आम्हां येणें घडे । संसार-स्थीती
आम्हां कां संसारा येणें । हरी-भक्ती नाम-स्मरणें
जड जीव उद्धरणें । नाम-स्मरणें करूनी
सर्व कर्म ब्रह्म-स्थीती । प्रतीपादावी वेदोक्ती
हें ची एक नीश्चीतीं । करणें आम्हां
नाना मतें पाखंड । कर्मठता अती बंड
तयाच ठेचणें तोंड । हरी-भजनें
वीश्वरूप सृष्टी । अर्जुना दावीली दृष्टी
भीन्न भेदा ची गोष्टी । बोलूं नये
एका जनार्दनी । धरीतां भेद मनीं
दुरावले येथुनी । नींदक ज़ाण

## अध्याय २१

१४३

ज़ें ज़ें बोले तैसा चाले । तो ची व्हीलें नीवांत
अंगीं असोनी ज़ाणपण । सदा सर्वदा तो लीन
नींदा अथवा वंदा । नाहीं वीषम ती बाधा
शांती चा मांदूस । भरला असे सदोदीत
एका जनार्दनी धन्य । ता चें दर्शन जग-मान्य

## १४४

असोनी संसारीं आपदा । वाचे वदे वीत्ठल सदा
नाहीं मानसीं तळमळ । सदा शांत गंगा-जळ
असोनीयां अकींचन । जी ची वृत्ती समाधान
अेका जनार्दनी अैसे थोडे । लक्षा मधें अेक नीवडे

## १४५

मज़ कोणी न देखावें । मज़ कोणी नोळखावें
मान देखोनीयां दृष्टी । पळे देह-अुपेक्षा पोटीं
मी अेक लौकीकीं आहें । अैसें कवणा ठावें नोहे
अैसा नीरपेक्ष सद्न्यानी । अेका शरण जनार्दनी

## १४६

छळीतां न येती रागा वरी । तदाकारीं वृत्ती मुराली
आप-पर नाहीं जेथें । भेद तेथें नसे ची
याती असो भलते परी । अेक सरी ज़या सी
अेका जनार्दनी भाव । अवघीया ठाव अेक ची

## १४७

आपुली च दारा ज़री टेके व्यभीचारा । क्रोधा चा थारा अंतरीं न ये
आपुलें च धन तस्करें नेतां ज़ाण । ज़या चें मन अुद्वीग्न नव्हे
आपुला ची पुत्र वधोनी ज़ाय शत्रु । परी मोहा चा पाझरु नेत्रीं न ये
आपुलें शरीर गांजीतां पर-नरें । परी शांती चें घर चळों नेदी
अेका जनार्दनी ज़या पूर्ण बोधु । तो ची अेक साधु जगा माजीं

१४८

मुखीं नाहीं नींदा-स्तुती । साधु वर्ते आत्म-स्थीती
राग-द्वेष समूळ गेल । द्वैताद्वैत हारपलें
घेणें देणें हा पसारा । नाहीं ज़या सी दुसरा
अेका जनार्दनी संत । जां चे हृदयीं भगवंत

१४९

देही असोनी वीदेही । चाले बोले सदा पाही
असे अखंड समाधी । नसे कांहीं आधी व्याधी
अुपाधी चें तोडोनी लाग । देहीं देहपणें भरलें जग
अेका जनार्दनी संग । सदा समाधान सर्वांग

१५०

ज़ो वस्तु झाला केवळ । ता चें अंतर कोमळ
भूतमात्रीं दयाळ । सर्वां परी भजन
जेथे रज तम वसती । तेथे द्वेष लोभ नांदती
ता चे संगें द्न्यान-ज्योती । वीझोनी जाय
अेका जनार्दनी शरण । जेथें शुद्ध सत्त्वा चें प्राधान्य
तो वस्तू सी ज़ाय मीळोन । सहजीं सहज

१५१

ब्रह्म सर्व-गत सदा सम । जेथें आन नाहीं वीषम
अैसे ज़ाणती ते अती दुर्गम । तयां ची भेटी झालीया भाग्य परम

अैसे कैसीया नें भेटती ते साधु । जां च्या अतर्क्य तर्कवेना बोधु
जां सी नीजानंदीं आनंदु । जां च्या परमानंदीं अुद्बोध

पवना घालवेल पालाण । पाअीं च्रढवेल गगन
भूत भवीष्य कळों येअील वर्तमान । परी ता साधूं चें न कळे महीमान

चंद्रामृत सुखें सेववेल । रवी अस्ता ज़ातां धरवेल
बाही हेळा सागर तरवेल । परी ता साधूं ची भेटी न'वेल

जप तप करवेल अनुष्ठान । ध्येय ध्याता धरवेल ध्यान
द्न्येय-द्न्याता-वीवर्जीत द्न्यान । द्न्याना-ध्याना चें मूळ हे साधुजन

नीजवृत्ती च्रा करवेल नीरोधु । जीवा-शीवा च्रा भोगवेल आनंदु
अेका जनार्दनी नीज-साधु । तां चा दर्शनें तुटे भव-बंधु

## अध्याय २२

१५२

आजीं सुदीन आ'मां सी । संत-संग कैवल्य-राशी
हें ची आमुचें साधन । आणीक नको आ'मां पठण
वेद-श्रुती-पुराण-मत । संत-सेवा ते सांगत
ज़ाणोनी वीश्वासलों मनीं । शरण अेका जनार्दनी

१५३

न ववतां शुद्ध अंतःकरण । संत-सेवा न घडे ज़ाण
शुद्ध संकल्पा वांचून । संत-सेवा न घडे ज़ाण
काम क्रोध दुराचार । यां चा करूं नये अंगीकार
आशा-मनीषां चें ज़ाळें । छेदुनी टाकीं वीवेक-बळें
अेका जनार्दनी ध्यान । सहज़ तण संतपण

१५४

गोल्हाट अुल्हाट कासया आटाआटी । घेतां संत-भेटी पुरें हें ची
ओहं कोहं यातायाती सोहं ज़ाण । टाकुनी संत-चरण धरा आधीं
अेका जनार्दनी मानावा वीश्वास । होय देवदास आपोआप

१५५

संता सी आवडे तो देवा चा ही देव । कळीकाळा चें भेव पाया-तळीं
आणीकां ची चाड नसे ची वासना । संता चा चरणां वांचूनीयां
अैसें जां चें प्रेम अैसी जां ची भक्ती । अेका जनार्दनी मुक्ती तेथें रावे

१५६

अैसे जे धाले पूर्ण नीमाले । ते नाहीं आले परतोनीयां
घडी नें घडी चढतसे गोडी । अखंड आवडी संतांपाओीं
अेका जनार्दनी रंगले नामीं । तयां वंदू आम्ही सर्व भावें

१५७

संता वांचोनीयां नाम न ये हातां । साधनें साधीतां कोटी ज़ाणा
जैसें कांते वीण करणें संसार । साधन-वीचार व्यर्थ ठेला
संत-समागम धरलीया वांचूनी । संसार-सांडणी नोहे बापा
अेका जनार्दनी संता सी शरण । रीघालीया ज़ाण देव ज़ोडे

## अध्याय २३

१५८

संतां चीये द्वारीं होअीन द्वारपाळ । न सांगतां सकळ करीन काम
तेणें माझा जीवा होअील समाधान । या परतें साधन आणीक नाहीं
शेष अुष्टावळी काढीन पत्रावळी । पूर्व कर्मा होळी सहज होय
अेका जनार्दनी हें ची पैं मागत । नाहीं दुज़ा हेत सेवे वीण

१५९

संतां चीये घरीं होअीन श्वान-याती । अुच्छीष्ट तें प्रीती मीळेल मज़
तेणें या देहा ची होअील शुद्धता । भ्रम मोह ममता नीवारेल
आशा-पाश सर्व ज़ातील तुटोनी । जीव हा बंधनीं मुक्त होय
अेका जनार्दनी भाकीन करुणा । शरीसंत-चरणां वारंवार

१६०

संतां चीये परीवारीं । लोळेन मी नीर्धारीं
जीवा होअील महालाभ । अैसा घडतां अुद्योग
सांडोनीयां थोरपण । शीव घाली लोटांगण
आपुलें महत्त्व । तेथें मीरवूं नये सत्य
शरण अेका जनार्दनी । ओंवाळावा जीव चरणीं

१६१

संत ज़ाती हरी-कीर्तना । तीं चीं वाहीन मोचे वाहणा
हें ची भवसींधू चें तारूं तेणें अुतरूं पैल पारु
जन्मोजन्मीं चें भेषज । तें हें संत-चरण-रज
संत-चरणीं चीं पादुका । झाला जनार्दन अेका

१६२

संत भलते याती असो । परी वीठ्ठल मनीं वसो
तया घालीन लोळणी । धेअून मी पायवणी
भलते द्नयाती चा । वीठ्ठल अुच्चारी वाचा
तेथें पावन देह चारी । अेका जनार्दनी नीर्धारीं

१६३

तुम्ही संत-जन । माझें अैका हो वचन
कृपा करा मज़ वरी । अेकदां दाखवा तो हरी
आहे तुमचे हातीं । म्हणोनी येतो काकुळती
अेका जनार्दनी म्हणे थारा । संतीं दावा मज़ पामरा

## अध्याय २४

१६४

संत-संगती नें झालें माझें काज़ । अंतरीं तें नीज प्रगटलें
बरवा झाला समागम । अवघा नीवारला श्रम
दैन्य दरीद्र दूर गेलें । संत-पाअुलें देखतां
अेका जनार्दनी सेवा । करीन मी आपुली भावा

## १६५

कैवल्य-नीधान तुम्ही संतजन । काया वाचा मन ज़डलें पाअीं
सर्‍व भावें दास अंकीत अंकीला । पूरणपणें झाला बोध देहीं
ज़ें जें द्‍ष्टी दीसे तें तें ब्‍रह्म रूप । अेका जनार्‍दनी दीप प्‍रज्‍वळला

## १६६

धन्‍य दीवस झाला । संत-समुदाय भेटला
कोडें फीटलें जन्‍मा चें । सार्‍थक झालें पैं साचें
आजीं दीवाळी दसरा । संत-पाय आले घरा
अेका जनार्‍दनी झाला । धन्‍य दीवस तो भला

## १६७

केला संतीं अुपकार । दीधलें घर दावुनी
न ये ध्‍यानीं मनीं लक्‍षीं । तो प्‍रत्‍यक्‍षीं दावीला
संकल्‍पा चें तोडीलें मूळ । आलें समूळ प्‍रत्‍यया
अेका जनार्‍दनी कृपावंत । होती संत सारथे

## १६८

मोकळें तें मन ठेवीलें बांधोनी । जनार्‍दन-चरणीं सर्‍व भावें
सुथीर मती झाली वार्‍ता ते ही गेली । द्‍वैता ची फीटली सर्‍व ममता
अेका जनार्‍दनी धन्‍य संत-सेवा । अुगवीला गोंवा गुंती सर्‍व

१६९

संत-द्वारीं कुतरा झालों । प्रेम-रसा सी सोंकलों
भुंकत भुंकत द्वारा आलों । द्न्यान-थारोळा बैसलों
कुतरा भुंकत आला होता । संतीं हात ठेवीला माथां
कुतरा-गळा ची सांखळी । केली संतां नीं मोकळी
अेका जनार्दनी कुतरा । दांत पाडुनी केला बोथरा

## अध्याय २५

१७०

मनोभाव जाणोनी माझा । सगुण रूप धरीलें वोझा
पाहुणा सद्गुरु-राज़ा । आला वो माये
प्रथम अंतःकरण ज़ाण । चीत्त शुद्ध आणी मन
झोथाळोनी आसन । स्वामी सी केलें
अनन्य आवडी चें जळ । प्रक्षाळीलें चरण-कमळ
वासना समूळ । चंदन लावी
अहं ज़ाळीयेला धूप । सद्भाव अुजळीला दीप
पंच प्राण हे अमूप । नैवेद्य केला
अेका जनार्दनी पूज़ा । देव भक्त नाहीं दुज़ा
अवघा चीं सद्गुरु-राज़ा । होवोनी ठेला

१७१

श्रीगुरू चें नाम-मात्र । तें ची आमुचें वेद-शास्त्र
श्रीगुरू चें चरण-रज । तेणें आमुचें झालें काज़
श्रीगुरू ची ध्यान-मुद्रा । ते ची आमुची योग-नीद्रा
अेका जनार्दनी मन । श्रीगुरु-चरणीं केलें लीन

१७२

गुरु परमात्मा परेशु । अैसा ज्या चा दृढ वीश्वासु
देव तया चा अंकीला । स्वयें संचला त्या चे घरा
अेका जनार्दनी गुरु देव । येथें नाहीं वा संशय

१७३

सेवे ची आवडी । आराम नाहीं अर्ध घडी
नीत्य करीतां गुरु-सेवा । प्रेम पढीभर होत जीवा
आळस येवों ची सरला । आराणुके चा ठावो गेला
तहान वीसरली जीवन । भूक वीसरली मीष्टान्न
अैसें सेवे गुंतलें मन । अेका जनार्दनी शरण

१७४

येवढें ज़या कृपे चें करणें । रंक राजेपणें मीरवती
तो हा कल्प-तरु गुरु जनार्दनु । छेदी देहाभीमानु भव-कंदु
कृपे चे वोरसें धावे कामधेनु । तैसा माझा मनु वेधलासे
अेका जनार्दनी तया वांचुनी कांहीं । दुज़ें पाहणें नाहीं मना माजीं

१७५

साधावया परमार्था । साह्य नव्हती माता पीता
साह्य नव्हती बहीण भांवअी । आपणा आपण साह्य पाहीं
साह्य सद्गुरु समर्थ । ते ची करीती स्व-हीत
अेका जनार्दनी शरण । नोहे अेकपणा वांचून

मराठी ग्रंथसंग्रहालय

१७६

दासा दुःख झालें फार । वेगीं केला प्रतीकार
पुण्य-स्थान मी पावलों । गुरु-चरणीं वीसावलों
कर ज़ोडूनीयां शीर । ठेवीयेलें पायां वर
जन्म-नाम जनार्दन । मुखीं गुरु-अभीधान

१७७

जन्मोजन्मीं चें संचीत । गुरु-पाईं ज़डलें चीत्त
तें तो सोडीली न सुटे । प्रेम-तंतु तो न तुटे
दुःखें आदळलीं वरपडा । पाय न सोडा हा धडा
अेका जनार्दनीं नीर्धार । तेथें प्रगटे वीश्वंभर

१७८

जय जय वो जनार्दने वीश्व-व्यापक संपूर्ण वो
सगुण अगुण वीगुण पूर्ण पूर्णानंदघन वो
ब्रह्मा वीष्णु रुद्र नीर्माण तुज़ पासोनी वो
गुण-त्रय अुभय-पंचक तूं ची अंतःकरणीं वो
जागृती स्वप्न सुषुप्ती तुर्या अुन्मनी हें स्थान वो
वीश्व तैजस प्राद्न्य प्रत्यगात्मा तू संपूर्ण वो
त्वंपद तत्पद आणीक असीपद तें तूं अेक वो
नसोनी अेकपणीं अेका अेकीं जनार्दन वो

## प्रकरण चौथें

### भक्ती-योग

### अध्याय २६

१७९

सुंदर तें ध्यान मांडीये घेउनी । कौसल्या जननी गीतीं गाये
सुंदर तें ध्यान नंदा चे अंगणीं । गोपाळ गौळणी खेळताती
सुंदर तें ध्यान चंद्रभागे तटीं । । पुंडलीका पाटीं उभें असे
सुंदर तें ध्यान अेका जनार्दनी । जनीं वनीं मनीं भरलासे

१८०

वेद ज़या लागीं नीत्य वाखाणीती । तो हा वेद-मूरती पांडुरंग
रवी-शशी दीप्ती जेणें प्रकाशती । तो हा तेजो-मूरती पांडुरंग
पांचां भूतां ची जो करीतो झाडणी । तो हा दन्यान-खाणी पांडुरंग
राज़ा त्रैलोक्या चा गुरुराज स्वामी । वसे अंतर्यामीं पांडुरंग
प्रभा हे ज़या ची पसरली जनीं । चीद्रूपा ची खाणी पांडुरंग
परोपकारा लागी अवतार केला । आनंदा चा झेला पांडुरंग
नेओ भक्ता सी ज़ो आपुल्या समीप । तो हा मायबाप पांडुरंग
ओीनीकर्तव्यता हे ची दासा लागीं । सेवावा हा जगीं पांडुरंग
अेका जनार्दनी देह हारपला । होउनी राहीला पांडुरंग

१८१

वीश्व पाळीताहे हरी । दासा केवीं तो अव्हेरी
नव मास गर्भ-वास । नाहीं भागला आ॑मांस
बाळपणीं वांचवीलें । स्तनीं दुग्ध तें नीर्मीलें
कीटक पाषाणां त वसे । ता चे मुखीं चारा असे
धरा धरा हा वीश्वास । अेका जनार्दनी ता चा दास

१८२

चरणां ची थोरी । ज़ाणे गौतम-सुंदरी
हृदया ची थोरी । भक्त ज़ाणती परोपरी
करां ची ती थोरी । जाणे सुदामा नीर्धारीं
सम-चरणीं ची शोभा । अेका जनार्दन अुभा

१८३

चरण वंदीती कां नींदीती । ते ही हरी-पदा ज़ाती
चरण वंदीतां तरली शीळा । नींदीतां तारीलें शीशुपाळा
अैसें चरणां चें महीमान । अेका जनार्दनी शरण

१८४

बहुतां चीं मतांतरें तीं टाकुनी । वीठ्ठल-चरणीं बुडी दे कां
न॑ये तुज बाधा काळा ची आपदा । ध्याअीं तूं गोवींदा प्रेम-भरीत
जनार्दना चा अेका लाहुनी चरणीं । बोलतसे वाणी करुणा-भरीत

१८५

नीवांत शुरीमुखं पहावें डोळेभरीं । तेणें नुरे अंतरीं अीच्छा कांहीं
चरणीं ते मींठी घालावे दंडवत । तेण पुरे आरत सर्व मनीं चें
हृदय-कमळीं पहावा तैसा ध्यावा । अेका जनार्दनी वीसांवा सहज ची

१८६

तुज़ सगुण ज़री ध्याअूं तरी तूं परीमीत होसी
तुज नीर्गुण ज़री ध्याअूं तरी तूं लक्षा न येसी
साच ची वेद-पुरुषा न कळसी शुरुती-अभ्यासें सीं
तो तूं नभा चा ज़े। साक्षी शब्दीं केवीं आतुडसी
जय राम रामा सच्चीदानंद रामा
भव-सींधु-तारक जय मेघ-श्यामा
अनंत-कोटी-ब्रह्मांडाधीशा अनुपम्य महीमा
अहं सोहं ग्रासुनी हें तों मागतसें तुम्हां
अष्टांग-योगें शरीर दंडुनी वायू सीं ज़ुंझ घेअूं
तेथें बहुसाल अंतराय तया चा येतसे भेअू
कर्म ची ज़री आचरूं दृढ धरूनीयां बाहो
तेथें वीधी-नीषेधा चा मोठा अंगीं वाज़तसे घावो
जनीं जनार्दन प्रत्यक्ष डोळां कां न दीसे या सी
ममताहंकृती योगी बुडवीती साधन आश्रमा सी
अेका जनार्दनी सीद्ध साधन कां न करीसी
सांडी मांडी न लगे मग तूं अवघा राम ची होसी

## अध्याय २७

१८७

राम हें माझें जीवीं चें जीवन । पाहतां मन हें झालें अुन्मन
साधन कांहीं नेणें मी अबला । श्याम हें बीज बैसलेंसे डोळां
लोपली चंद्र-सूर्या ची कळा । तो माझा राम जीवीं चा जीव्हाळ
प्रकाश दाटला दाही दीशां । पुढें हो मार्ग न दीसे आकाशा
खुंटली गती श्वासा-अुच्छ्वासा । तो राम माझा भेटेल कैसा
या सी हो साच परीसा कारण । अेका जनार्दनी शरण तरी च साधन

१८८

कृष्णा धांव रे लवकरीं । संकट पडलें भारी
हरी तूं आमुचा कैवारी । आलें वीघ्न नीवारीं

आजीं नीष्ठुर कां झालासी । होअील बा गती कैसी
अनाथ मी देवा परदेशी । धांव तूं वेगें सीं

आतां न लावीं अुशीर । अनर्थ करील फार
अेवढा करीं अुपकार । दे दर्शन सत्वर

कंठ शोषला अनंता । प्राण जाअील आतां
पदर पसरीतें अच्युता । पाव रुक्मीणी-कांता

अैकुनी बहीणी ची करुणा । आला यादव-राणा
द्रौपदी लोळत हरी-चरणा । अेका जनार्दना।

## १८९

तें मन नीष्ठुर कां केलें । ज़ें पूर्‍ण दय नें भरलें
गजेंद्राचे हाके सरीसें । धांवुनीयां आलें
प्रह्लादा चा भावार्था सी । स्तंभीं गुरगुरलें
पांचाळी चा करुणा-वचनें । कळवळुनी आलें
अेका जनार्दनी पूर्‍ण कृपे नें । नीशी-दीनीं पदीं रमलें

## १९०

भजन नाहीं मी अकर्मी वायां । अभीनव अवगती झाली देवराया
नीचा नीच मी ची अेक । मज़ वरी अुपरीं वर्ते सकळ लोक
अंधा अंध अधोगत पाहीं । मज़ हूनी अंध कोणी नाहीं
अेका जनार्दनी नीच हा नेला । मुंगीये चे पाअीं सगळा समावला

## १९१

कअीं तया मार्गें चरण चालती । अैसी वाटे थेंनी दीन-राती
कअीं या मना ची पुरेल वासना । कअीं मीठी चरणा देअीन जीवें
कअीं हें भाळ ठेवीन चरणीं । कअीं पायवणी घेअीन सुखें
अेका जनार्दनी कअीं होअीळ कृपा-दान । कअीं नारायण प्रेमें भेटे

## १९२

आनंदा चा भोग घालीन आसनीं । वैकुंठ-वासीनी तुझे नावें
येअीं वो वीठ्ठले अनाथां चे नाथे । पंढरी-दैवते कुळ-देवी
आपुल म्हणावें सनाथ करावें । अेका जनार्दनी वंदावें संत-जना

## १९३

मागणें हें ची माझें देवा। दुजेपण दुरी ठेवा
मी-तूं अैसी नको अुरी। जनार्‌दना कृपा करी
रंक मी अेक दीन। माझें करावें स्मरण
नीच सेवा मज़ दावी। अेका जनार्‌दनी आस पुरवावी

## १९४

जेथें जेथें मन ज़ाअील वासना। फीरवावें नारायणा हें ची देअी
वारंवार दावा नामा च्या आठव। कुबुद्‌धी च्या ठाव पुसा सर्‌व
भेदा ची भावना तोडावी कल्पना। छेदावी वासना स-मूळ कंद
अेका जनार्‌दनी नको दुज़ा छंद। राम कृष्ण गोवींद आठवावा

## १९५

सर्‌वा भूती तुझें रूप। हृदयीं सीद्‌ध ची स्वरूप
अीतुलें देअी अधोक्षजा। नाहीं तरी घोंट भरीन तुझा
सकळां हुनी करी सान। सकळीकां सम समान
नी:शेष दवडोनीयां स्वार्‌थ। अवघा करी परमार्‌थ
अेका जनार्‌दनी मागे। नाहीं तरी घाला घालीन अंगें

१९६

जय गोवींदा परमानंदा अैक माझे बोल
नीर्गुण-रूपें असतां तुझें कांहीं च न'वे मोल
मग तूं माया धरुनी अती झालासी सबळ
नसतें देवपण अंगीं आणुनी चाळवीसी केवळ
नसतां तुज़ मज़ भेद देवा लटीकें जीवपण देसी
आपुले ठाअीं थोरपण आणुनी आमुची सेवा घेसी
नसती अवीद्या पाठी लावुनी संसारीं गोवीसी
नाना कर्में केलीं 'मणुनी आ'मां कां दंडीसी
आपुली महीमा वाढो 'मणुनी आकस आरंभीलें
तुज़ मज़ देवा वैर अैसें न'वे भलें
अैसें तुज़ मज़ वैर 'मणोनी गुरू मी शरण गेलों
देव-भक्तपण कोण कर्में मग पुसों लागलों
सद्गुरु 'मणती सर्व ही मायीक नीश्चयें बोलीलों
देव आणी भक्त अेक ची गोष्टी सी पावलों
आतां सद्गुरु-वचनें तुझें गीळीन देवपण
तुझीया नेणों भक्ता वरी घालीन पाषाण
जीव शीव दो'नी मीळोनी मग मी सुखें राहीन
तुज मज रूप ना रेखा ता तें नीर्धारीन
अैसे भक्त-बोले अैकुनी देवा थोर अुपज़ली चींता
वीवेक-बळ करुनी माझें देवपण अुडवील आतां

या लागीं भीणें भकत-जनां सी अैक्य करुनी ततत्वतां
अेका जनार्दनी दर्शन दावें त्वरीता

## अध्याय २८

१९७

आत्मां सी तों पुरे वीठ्ठल ची अेक। वाअुगा ची देख दुज़ा न मनीं
ध्यान धरूं वीठ्ठल करूं ता चें कीर्तन। आणीक चींतन नाहीं दुज़ें
ध्येय ध्याता ध्यान खुंटला पै शब्द। वीठ्ठल अुद्बोध सुख आत्मा
अेका जनार्दनी वीठ्ठल भरला। रीता ठाव अुरला कोठें सांगा

१९८

गातों अेका ध्यातों अेका। अंतर्बाहीं पाहतों अेका
अगुणीं अेका सगुणीं अेका। गुणातीत पाहतों अेका
जनीं अेका वनीं अेका। नीरंजनीं देखों अेका
संत-जनां पढीये अेका। जनार्दना कडीये अेका

१९९

गाअूं तरी अेक वीठ्ठल ची गाअूं। ध्याअूं तरी अेक वीठ्ठल ची
पाहूं तरी अेक वीठ्ठल ची पाहूं। आणीका न गोवूं वासना ही
आठवूं तो अेक वीठ्ठल आठवूं। आणीक न सांठवूं हृदया माजीं
अेका जनार्दनी ज़डला जीवारीं। वीठ्ठल चराचरीं व्यापुनी ठेला

२००

तुमचें नाम-संकीर्तन । हें ची माझें संध्या-स्नान
तुमचा पाया चें वंदन । हें ची माझें अनुष्ठान
तुमचा पाया चा साक्षेप । हा ची माझा काळ-क्षेप
तुमचा प्रेमें आली नीद्रा । ही च माझी ध्यान-मुद्रा
अेका जनार्दनी सार । ब्रह्म-रूप हा संसार

२०१

चरणा ची सेवा आवडी करीन । काया वाचा मन धरुनी जीवीं
या परतें साधन न करीं तुझी आण । हा चा परीपूर्ण नेम माझा
अेका जनार्दनी अेकत्वें पाहीन । हृदयीं ध्याअीन जनार्दन

२०२

जगदात्मा श्रीहरी आनंदें पूजीन । अंतरीं करीन महोत्सव
द्वैत वीसरूनी करीन पाद-पूजा । तेणें गरुड-ध्वजा पंचामृत
शुद्धोदक-स्नान घालीन मानसीं । द्न्यानें स्वरूपा सी परीमार्जन
सत्त्व क्षीरोदक देवा नेसवीन । राजस प्रावरण पीतांबर
दीव्य अलंकार तोडर सोज्वळ । सहज-स्थीती लेअील स्वामी माझा
भक्ती नववीधा घालुनी सींहासन । अेका जनार्दन-पूजा करी

## अध्याय २९

२०३

अवघें ची त्रैलोक्य आनंदा चें आतां । चरणीं जगन्नाथा चीत्त ठेलें
माय जगन्नाथ बाप जगन्नाथ । अनाथां चा नाथ जनार्दन
अेका जनार्दनी अेकपणें अुभा । चैतन्या ची शोभा शोभलीसे

## २०४

चंद्रा हूनी शीतळ रवी हूनी सोज्वळ । तेणें मज्ज कवळ वेधीलें बाओी
अमृता हूनी स्वादु गगना हुनी मृदु । रूपें वीण आनंदु देखीला बाओी
अेका जनार्दनी आनंदु परीपूर्ण । काया वाचा मन वेधीलें बाओी

## २०५

आनंद अद्वय नीत्य नीरामय । सांवळा भासताहे मज़ लागीं
वेधु तया च्या माझीया जीवा । काया वाचा मनोभावा लागलासे
वेधलेंसें मन झालें अुन्मन । देखतां चरण गोड वाटे
पाहतां पावतां पारुषला जीव । अेका जनार्दनी देव कळों आला

## २०६

जगा च्चें जीवन मना च्चें मोहन । योगीयां च्चें ध्यान वीठ्ठल माझा
द्वैताद्वैता हूनी वेगळा । वीठ्ठल कळा पूरणीमे ची
न कळे आगमा नेणवे ची दुरगमा । अेका जनार्दनी आम्हां सांपडला

## २०७

आजी च्चा सुदीनु आम्हां झाला आनंदु । सकळां स्वरूपीं स्वयें देखें गोवींदु
पाहीला गे माये आतां सांगूं मी कैसें । जेथें पाहे तेथें गोवींदु दीसे
पाहतां पाहणें तटस्थ ठेलें । सबाह्य अभ्यंतरीं पुरुषोत्तमें कोंदलें
या परी पाहतां हरुष होतसे मना । अेका जनार्दनी धणी न पुरे मना

२०८

चतुर्भुज श्याम-मूर्ती । शंख-चक्र ते शोभती
पीतांबर वैजयंती । रुळती गळां
देव देखीला देखीला । तेणें संसारा चा ठावो पुशीला
वीदेही तो भेटला । भक्त तयातें
दोघां होतां ची मीळणी । नुरे देव-भक्तपणीं
फीटली आयणी । सर्व कोड कठीण
छंद पाहीजे नामा चा । नीश्चयो काया मनें वाचा
अेका जनार्दनी ता चा । देव होय अंकीत

२०९

अवघा व्यापक दावीला । माझा संदेह फीटला
मन होतें गुंडाळलें । आपुले चरणीं पैं ठेवीलें
नाहीं पहावया दृष्टी । अवघा जनार्दन सृष्टी
दुजा हेत हारपला । अेका जनार्दनी अेकला

२१०

जन्म-मरणा चें तुटलें सांकडें । कैवल्य रोकडें अुभें असे
डोळीया चा डोळा अुघड दावीला । संदेह फीटला अुरी नुरे
अेका जनार्दनी संशय ची नाहीं । जन्म-मरण देहीं पु'नां नये

२११

सायासा चें बळ । तें आजीं झालें अनुकूळ
धन्य झालें धन्य झालें । देवा देखीलें हृदयीं
अेका जनार्दनी संशय फीटला । देव तो देखीला चतुर्भुज

२१२

आजीं देखीलीं पाउलें । तेणें डोळे धन्य झाले
मागील शीण भारु । पाहतां न दीसे नीर्धारु
जन्मा चें तें फळ । आजीं झालें सुफळ
अेका जनार्दनी डोळां । वीठ्ठल देखीला सांवळा

२१३

अीच्छा केली तें पावलों । देखतां ची धन्य झालों
होतें सुकृत पदरीं । तुमचे चरण देखीले हरी
गेलें भय आणी चींता । कृतकृत्य झालों आतां
आजीं पुरला नवस । अेका जनार्दनी झालों दास

## अध्याय ३०

२१४

भगवद्भावो सर्वां भूतीं । हें ची द्न्यान हे ची भक्ती
वीवेक वीरक्ती । या ची नांवें
हें सांडूनी वीषय-ध्यान । तें ची मुख्यत्वें अद्न्यान
जीवीं जीवा बंधन । येणें ची दृढ
आठव तो परब्रह्म । नाठव तो भव-भ्रम
देहीं चें नीज-वर्म । ज़ाण बापा
आठव वीसर चीत्तीं । जेणें ज़ाणीजेती
तें ची अेक नीश्चीतीं । नीजरूप
अेका जनार्दनी । सहज नीज-बोधनीं
सबाह्य अभ्यंतरीं । पूर्ण परमानंदु

२१५

भक्ती चे अुदरीं जन्मलें द्न्यान । भक्तीनें द्न्याना सी दीधलें महीमान
भक्ती तें मूळ द्न्यान तें फळ । वैराग्य केवळ तेथी चें फूल
फूल फळ दोन्ही येरयेरा पाठीं । द्न्यान वैराग्य तेवीं भक्ती चें पोटीं
भक्ती वीण द्न्यान गींवसीती वेडे । मूळ नाहीं तेथें फळ केवीं ज़ोडे
अेका जनार्दनी शुद्ध भक्ती-क्रीया । ब्रह्म-द्न्यान ती ची लागतसे पायां

२१६

भक्ती-प्रेमावीण द्न्यान नको देवा । अभीमान नीत्य नवा तया माजीं
प्रेम-सुख देअीं प्रेम-सुख देअीं । प्रेमें वीण नाहीं समाधान
अेका जनार्दनी प्रेम अती गोड । अनुभवी सुरवाड ज़ाणतील

२१७

भक्ती चा पोटीं मुक्ती पैं आली । भक्तीनें मुक्ती तें वाढवीलें
भक्ता ते माता मुक्ती ते दुहीता । जाणोनी तत्वतां भजन करीं
भक्ती सोडूनी मुक्ती वांछीती वेडीं । गूळ सोडोनी कैसी ते गोडी
अेका जनार्दनी अेक भाव खरा । भक्ती मुक्ती दाटूनी आलीया घरा

२१८

अभेदा वाचून । न कळे भक्ती चें महीमान
साधीतां साधन । वीठ्ठलरूप न कळे
मूळ पाहीजे वीश्वास । दृढता आणी आस
मोक्षा चा सायास । येथें कांहीं नको ची

आशा मनीषा सांडा परते । काम-क्रोध मारा लाते
तेणें ची सरते । तु'मी 'बाळ लोकीं
दृढ धरा अेक भाव । तेणें चरणीं असे ठाव
अेका जनार्दनी भेव । नाहीं मग काळा चें

## २१९

अभाग्य न भज़ती भगवंतीं । तीं स पृथ्वी असे जडत्व देती
जळें दीधली तीं अधोगती । तेजें दीधली संताप-वृत्ती
वायू नें दीधलें तीं चंचलत्व । नभें दीधलें भाव-शून्यत्व
महत्तत्त्वें दीधलें महत्त्व । मायें दीधलें तीं ममत्व
सभाग्य भावें भज़ती भगवंतीं । तीं स पृथ्वी देतसे नीज-शांती
जळें दीधली मधुर रस-वृत्ती । तेजें दीधली नीज-तेज-प्रभा-दीप्ती
वायु अुपरमें दे नीश्चलत्व । नभें दीधलें तीं अलीप्तत्व
महत्तत्त्वें दीधलें शोधीत-सत्त्व । मायें दीधलें सद्वीद्या परम-तत्त्व
अेका जनार्दनी नीज-भक्ती । तैं अलभ्य लाभ होय प्राप्ती
भूतें महाभूतें प्रसन्न होती । तेणें न भंगे ब्रह्म-स्थीती

## २२०

देव प्रसन्न झाला माग 'मणे वहीला । भक्त घरोघरीं वीचार पुसों गेला
भाव कीं भ्रांती आळस कीं भक्ती । वीचारूनी व्यक्ती ठाअीं ठेवा
अरे हें गुह्य गोप्य कुडें करूं नये अुघडें । तरी द्वारोद्वार पुसों ज़ाय वेडें
अेका जनार्दनी शीतल भाव । आळसें ची देव दु'रावला

२२१

मी वासुदेव-नामें फोडीतों नीत्य टाहो।
देखिले पाय आतां मागतों दान दी हो
सांवळें रूप माझी मानसीं नीत्य राहो
पावन संत-वृंदें सादरें दृष्टी पाहो
सांडोनी सर्व चींता संत-पदीं लक्ष लागो।
मुक्त मी सर्व संगीं सर्वदा वृत्ती जागो
भावीक प्रेमळां ची संगती चीत्त लागो
अद्वैत-वृत्ती चालो अक्षयीं भक्ती-योग
स्वप्नीं ही मानसा तें नातळो द्वैत-संग
अद्वयानंद-वेधें नावडो अन्य भोग
अक्रीयत्व ची वाहो सक्रीयारूप बोध
पाहतां वीश्व मातें नीजरूप दाखवी
सत्कथा-श्रवण कर्णीं पीयूष चाखवी
रसने नाम-मंत्र सर्वदा प्रेम देई
तोषला देवराणा म्हणे बा रे घेई
हें दान पावलें सद्गुरू शांती-लींगा
हें दान पावलें आत्मया पांडुरंगा
हें दान पावलें व्यापका अंतरंगा
हें दान पावलें अेका जनार्दना दोष जाती भंग।

२२२

काया ही पंढरी आत्मा हा वीठ्ठल । नांदतो केवळ पांडुरंग
भाव-भक्ती भीमा अुदक तें वाहे । बरवा शोभताहे पांडुरंग

द्या क्षमा शांती हें ची वाळुवंट । मीळालासे थाट वैष्णवां चा
देखीली पंढरी देहीं जनीं वनीं । अेका जनार्दनी वारी करी

२२३

नववीधा भक्ती नव आचरती । तीं ची नाम-कीर्ती सागूं आतां
अेक अेक नाम घेतां प्रातःकाळीं । पापा होय होळी क्षण-मात्रें
श्रवणें परीक्षीती तरला भूपती । सातां दीवसां मुक्ती झाली तया
श्री शुक आपण करूनी कीर्तन । अुद्धरीला ज़ाण परीक्षीती
हरीनाम-घोषें गर्जे तो प्रह्लाद । स्वानंदें प्रबोध झाला ता सी
पायां चा महीमा स्वयें ज़ाणे रमा । प्रीय पुरुषोत्तमा झाली तेणें
पृथुराया बाणलें देवा चें अर्चन । तेणें समाधान पावला तो
गाओ चीया मागें श्रीक्षण-पाअुलें । अक्रूरें घातलें दंडवत
दास्यत्व मारुती अर्चे देह-स्थीती । सीता-शुद्ध कीर्ती केली तेणें
सख्यत्व स्वजाती सोयरा श्रीपती । सर्व भावें प्रीती अर्जुना सी
आत्मनीवेदन करूनीयां बळी । झाला वनमाळी द्वार-पाळ
नववीधा भक्ती नव ज़णें केली । पूर्ण प्राप्ती झाली तयां लागीं
अेका जनार्दनी आत्म-नीवेदन । भक्ती दुज़ेपण अुरलें नाहीं

## अध्याय ३१

२२४

भजन भावा तें नीपज़वी । भाव देवा तें अुपज़वी
अैसा भजनें देव केला । भक्त वडील देव धाकुला
भक्ता कारणें संकल्प । भक्त देवा चा ही बाप
देव भक्ता चें पोटीं । झाला म्हणोनी आवड मोठी
अेका जनार्दनी नवलावो । कैसा भक्त ची झाला देवो

२२५

आधीं देव पाठीं भक्त । अैसें मार्गें आलें चालत
हें ही बोलणें ची वाव । भक्ता आधीं कैंचा देव
भक्त शीरोमणी भावा चा । देव लंपट झाला साचा
भक्ता साठीं अवतार । अैसा आहे नीर्धार
वडील भक्त धाकुला देव । अेका जनार्दनीं नाहीं संदेह

२२६

भक्तपणा सान नव्हे रे भाअी । भक्ता चे पाय देवा चे हृदयीं
भक्त ते ची देव भक्त तो ची देव । जाणती हा भाव अनुभवी
दान-सर्वस्वें अुदार बळी । ता चें द्वार राखे सदा वनमाळी
अेका जनार्दनी मीती नाहीं भावा । देव ची करीतो भक्ता ची सेवा

२२७

भक्ता लागीं अणुमात्र व्यथा । ते ने साहव भगवंता
करूनी सर्वांगा चा ओढा । नीवारीतसे भक्त-पीडा
होअुनी भक्ता चा अंकीत । सारथीपण तो करीत
अैसा अंकीत चक्र-पाणी । अेका शरण जनार्दनी

२२८

मीठी घालुनीयां भक्तां । म्हणे शीणलेती आतां
धांवे चुरावया चरण । अैसा लाघवी आपण
योगीया सी भेटी नाहीं । तो आवडी नें कवळी बाही
अेका जनार्दनी भोळा । भक्तां आलींगी सांवळा

## २२९

सात्त्वपणें देवा शरण पैं ज़ाती । तयां वैकुंठपती वीसरेना
ज़ैसी कन्या दूर-देशीं अेकटीं । रात्रं-दीवस संकटीं घोकी मायबाप
पती-व्रते चें सर्व मन पती-पाअीं । तैसा देव ठाअीं तीष्ठतसे
अेका जनार्दनी मज़ हा अनुभव । जनार्दनीं देव दाखवीला

## २३०

देव धावे मागें न करी आळस । सोंडीतां भव-पाश माया-जाळ
सर्व भावें जे कां शरण रीघती । तयां चें ओझें श्रीपती अंगें वाहे
नको भुक्ती मुक्ती सदा नामीं हेत । देव तो अंकीत होय त्या च्चा
अेका जनार्दनी अैसा ज्यां च्चा भाव । तया घरीं देव पाणी वाहे

## २३१

अेका घरीं द्वार-पाळ । अेका घरीं होय बाळ
अेका घरीं करी च्चोरी । अेका घरीं होय भीकारी
अेका घरीं युद्ध करी । अेका घरीं पूजा बरी
अेका घरीं खाय फळें । अेका घरीं लोणी बळें
अेका अेकपणें अेकला । अेका जनार्दनी प्रकाशला

## २३२

खुर्पू लागे सांवता सी । न पाहे यानी सी कारण
घडी मडकें कुंभारा चें । च्चोखामेळ्या चीं ढोरें ओढी
सज्जन कसाया चें वीकी मांस । दामाजी च्चा दास स्वयें होय
अेका जनार्दनी ज़नी संगें । दळूं कांडूं लागे आपण

२३३

तुम्ही कृपाळु जी देवा । केली सेवा आवडी
करुनी सदा संमार्जन । पाळीलें वचन प्रमाण
अुगाळुनी गंध पुरवीलें । सोहळे केले दासा चे
अैसा अपराधी पतीत । अेका जनार्दनी म्हणत

२३४

देवो वीसरे देवपण । अर्पी वासना भक्ता सी
भक्त-देहीं सदा वसे । धर्म अर्थ अर्पीतसे
ज़े ज़े भक्ता ची वासना । पुरवी आपण तो ची कृष्णा
अेका जनार्दनी अंकीत । अुभा तेथें ची तीष्ठत

२३५

अभेद-भजना चा हरीख । देव भक्त झाले अेक
कोठें न दीसे भेद-वाणी । अवघी काहाणी बुडाली
हरपलें देव-भक्तपण । जनी झाला जनार्दन
अेका जनार्दनी देव । पुढें अुभा स्वयमेव

## अध्याय ३२

२३६

देव म्हणे भक्तां सी आवडी । मी झालों तुमचा गडी
सांगाल तें करीन काम । मज़ वरी ठेवा तुमचें प्रेम

भाव मज़ दावा । आणीक मज़ नाहीं हेवा
आवडी नें देव बोले । भक्तां माजीं स्वयें खेळे
खेळतां गोपाळीं । अेका जनार्दनी गोकुळीं

२३७

बहु बोला चें नाहीं कारण । मी देह भक्त आत्मा ज़ाण
माझा देह शरीर ज़ाण । भक्त आंत पंच प्राण
नांदे सहज भक्त आंत । मी देह भक्त देहातीत
अेका जनार्दनी भक्त । देवपणा मी भक्तांकीत

२३८

तुमचे अप्रमाण होतां बोल । मग फोल जीवीत्व माझें
कासया वागवूं सुदर्शन । नाहीं कारण गदे चें
तुमचा बोल ’वावा नीका । हे ची देखा मज़ प्रीय
मज़ यावें अुणेपण । तुमचें थोरपण प्रकाशूं दा
अेका जनार्दनी देव । स्वयमेव बोलती

२३९

मज़ ज़े अनुसरले काया वाचा मनें । तीं चें चालवणें मज़ सर्व
अृणवअी तीं चा अनंत जन्मां चा । ज़े गाती वाचा कीर्ती माझी
तयां चीया द्वारीं लकष्मी सहीत । अुभा मी तीष्ठत याचकपणें
सर्व ज़ड-भारी ज़ाणे योग-क्षेम । अेका जनार्दनी नेम ज़ाण माझा

२४०

मज़ सी जेणें वीकलें शरीर । ज़ाणें मी नीर्धार अंकीत ता च्या
ता चें सर्व काम करीन मी अंगें । पडों नेदी व्यंगें सहसा कोठें
अ‍ेका जनार्दनी ता च्या मी अंकीत । राहे पैं तीष्ठत ता चे द्वारी

२४१

माझा शरणागत न दीसे केवीलवाणा । ही तों लाज ज़ाणा माझी मज़
अ‍ेकवीध भावें आलीया शरण । कर्म धर्म ज़ाण पूर्ण ता चे
समर्था चे मुला काय उणे याची चींता । तैसें मी ता तत्वतां न वीसंबें
अ‍ेका जनार्दनी हा माझा नेम । आणीक नाहीं वर्म भावें वीण

२४२

सर्व कर्म मदर्पण । करीतां मन होय शुद्ध
न्यून तें चढतें ज़ाण । करी संपूर्ण मी अेक
मन ठेवुनी माझा पाअी । बसो कोठें भलते ठाअी
अ‍ेका जनार्दनी मन । करा मज़ ची अर्पण

२४३

अ‍ैके अुद्धवा प्रेमळा । सांगतो जीवी च्या जीव्हाळा
तूं भक्त-राज नीर्मळा । सुचीत अ‍ैके
मी बैसोनी आसनीं । पूजा करीतों नीशीदीनीं
ते पूज्य मूर्ती तुज़ लागुनी । नाहीं ठाअुकी अुद्धवा
माझें आराध्य दैवत । ते कोण ’मणसी सत्य
भक्त माझें जीवी चें हेत । ज़ाणती ते

माझें वीश्रांती चें स्थान । माझे भक्त सुख-नीधान
काया वाचा मन । मी वीकीलों तयां सी
ते हे भक्त परीयेसी । अुद्धवा सांगे हृषीकेशी
अेका जनार्दनी सर्वां सी । तें ची वदतसे

## प्रकरण पांचवें

### आत्म-दर्शन

**अध्याय ३३**

**२४४**

सगुण गुण-माया । आली को'लाटीण खेळाया
प्रपंचा चा रोवीला वेळू । चहूं शून्याचा मांडीला खेळु
ब्रह्मा वीष्णु ज़ये चे बाळु । लागती पायां
आला गडे नीर्गुणा चा को'लाटी । सोहं-शब्दें ढोलगें पीटी
चैतन्या ची अुघडुनी दृष्टी । ज़ाअूं पाहाया
को'लाटीण बैसली असे डोळां । ज़ाणे गुरु-पुत्र वीरळा
अेका जनार्दनी लीळा । ज़ाती वर्णाया

**२४५**

अेका देहा मार्जी दोघे पैं वसती । अेका सी बंधन अेका मुक्त गती
पहा हो समर्थ करी तैसें होय । कोण ती सी पाहे वक्र-दृष्टी
पाप पुण्य दो'नी भोगवी अेका हातीं । अैसी आहे गती अतर्क्य ते
अेका जनार्दनी जनीं जनार्दन । तया सी नमन सर्व भावें

२४६

सात्वीका भरणें रोमां सी दाटणें । स्वेदा चें जीवन येअूं लागे
कांपे तो थरारी स्वरूप देखे नेत्रीं । अश्रु ती भीतरीं वाहताती
आनंद होय पोटीं स्तब्ध झाला कंठीं । मौन वाक्-पुटीं धरुनी राहे
टाकी श्वासोच्छ्वास अश्रुभाव देखा । जीरवुनी अेका स्वरूप होय
अेका जनार्दनी अैसे अष्ट भाव । अुत्पन्न होतां देव कृपा करी

२४७

सहज सहज अैशा करीताती गोष्टी
परी सहजा ची भेटी वीरळा ज़ाणे
सहजा ची आवडी वीद्या अवीद्या तोडी
ज़ाणीव-नेणीवे ची राहूं नेदी बेडी
ज़ाणीवा ज्ञाणपण नेणीवा नेणपण
दोही चा वींदानें सहजा चें दर्शन
अेका जनार्दनी ज़ाणीव ना नेणीव
सहज चैतन्या सी देअून ठेला खेंव

२४८

मी तूं अैसी परी । ज़ैसे तरंग सागरीं
दोही माजी अेक ज़ाणा । कृष्ण द्वारावती-राणा
तंतु वस्त्र दोन्ही अेक । तैसे जगा सी व्यापक
देव भक्त अैसी बोली । भ्रांती नीरसेनासी झाली
अेका जनार्दनी कृपा । भ्रांती कैसी जगीं पहा पां

२४९

चक्षु-दरपणीं जग हें पाहा । जगज्जीवनीं मुरनी राहा
तुरया-कालींदी-तीरथीं नाहा । पाप-पुण्या सी तीळांजळी वाहा
तीं'नी अवस्था सांडुनी मागें । अरध-चंद्रा चा चांदणा त वागे
चांदणें गरासुनी ता ठाईं ज़ागे । गड अुन्मनी झडकरी वेगें
अेवढें ब्रह्मांड-फळ जा देठीं । तें आटलें देखणा चे पोटीं
ता सी पाहतां पाठी ना पोटी । मी-तूंपणा चा पडली तुटी
चार सहा दहा बारा सोळा । हा तो आटला देखणा चा कळा
कळातीत स्वयंभ नीराळा । अेका जनारदनी सरवांग डोळा

## अध्याय ३४

२५०

वरम ज़ाणे तो वीरळा । ता चीं लक्षणें पैं सोळा
देहीं देव पाहे डोळां । तो ची ब्रह्म-दन्यानी
जन नींदो अथवा वंदो । ज़या नाहीं भेदाभेद
वीधी-नीषेधा चे शब्द । अंगीं न बाणती
कारय कारण करतव्यता । हें पीसें नाहीं सरवथा
अुन्मनी समाधी अवस्था । न मोडे ज़या ची
करम-अकरमा चा ताठा । न बाणे ची अंगीं वोखटा
वाअुगा ता चेषटा । करी ना कांहीं
शरण अेका जनारदनी । तो ची अेक ब्रह्म-दन्यानी
तया चे दरशनीं । पराणीयां सी अुद्धार

२५१

नीरपेक्ष नीर्द्वंद्व तो ची ब्रह्म-द्न्यानी
नायके ची कानीं परापवाद
सर्वदा सबाह्य अंतरीं शुचीत्व
न देखे न दावी महत्व जगीं वायां
अेका जनार्दनी पूर्णपणें धाला
शेज़े च्या मुराला रसीं अुतरे

२५२

ज़ागा परी नीज़ला दीसे । कर्म करी स्फुरण नसे
सकळ शरीरा च्या गोळा । होय आळसा च्या मोदळा
संकल्प-वीकल्पा ची ख्याती । अुपज़े ची ना कदा चीत्तीं
या परी जनीं असोनी वेगळा । अेका जनार्दनी पाहे डोळां

२५३

दृष्टी देखे पर-ब्रह्म । श्रवणीं अैके पर-ब्रह्म
रसना सेवी ब्रह्म-रस । सदा आनंद अुल्हास
गुरू-कृपे चें हें वर्म । जग देखे पर-ब्रह्म
अेका जनार्दनी चराचर । अवघें जाी सी परात्पर

२५४

ब्रह्म-स्थीती चें हें वर्म । तुज़ दावीतों सुगम
सर्वां भूतीं भगवद्भाव । अभेदत्वें आपण ची देव
संसार ब्रह्म-स्फूर्ती । सांडोनीयां अहंकृती
शरण अेका जनार्दन । कृपे पावला परीपूर्ण

## अध्याय ३५

२५५

जनार्दनें मज़ केला अुपकार । पाडीला वीसर प्रपंचा चा
प्रपंच पारखा झाला दुरीचारी । केलीसे बोहरी काम-क्रोधा
आशा तृष्णा ही चें तोडीयेलें ज़ाळें । कामने च काळें केलें तोंड
अेका जनार्दनी तोडीलें लीगाड । परमार्थ गोड दाखवीला

२५६

सर्व भावें दास झालों मी अुदास । तोडीला माया-पाश जनार्दनें
माझें मज़ दावीलें माझें मज़ दावीलें । अुघडें अनुभवलें परब्रह्म
रवीबींबा परी प्रकाश तो केला । अंधार पळवीला काम क्रोध
अेका जनार्दनी अुघडा बोध दीला । तो ची ठसावला हृदया माजी

२५७

अभीनव गुरू नें दाखवीलें । ओहं सोहं माझें गीळीलें
प्रपंचा चें अुगवोनी ज़ाळें । कलें षड्वैरीयां चें तोंड काळें
अुदो-अस्ता वीण प्रकाश । स्वयें देही दावीला भास
मीपण नाही अुरलें । अेका जनार्दनी मन रमलें

२५८

अभीनव सांगतां वीसमयो दाटला । देहीं च भासला देव माझा
नवल कृपे चें वींदान कैसें । जनार्दनें सरसें केलें मज़
साधना चीं आटी न करीतां गोष्टी । ह्रदय-संपुटीं दावीला देव
अेका जनार्दनी अेकपणें शरण । न कळे महीमान कांहीं मज़

२५९

पीक पीकलें प्रेमा चें । सांठवीतां गगन टांचें
भूमी शोधोनी पेरीलें बीज । सद्गुरु-कृपे अुगवलें सहज़
काम-क्रोधा चा अुपटोनी पेंडी । कल्पने चा काशा काढी
अेका जनार्दनी नीजभाव । वीश्वंभरीत पीकला देव

२६०

मुक्ती आणी मुक्ती फुका चें ठेवणें । गुरू जनार्दनें तुच्छ केलें
साधन अष्टांग यद्न्य तप दान । तीर्थी तीर्थाटण शीण वायां
अेका जनार्दनी दावीला आरीसा । शुद्ध ता सरीसा सहज़ झालों

२६१

गुरु-कृपांजन पायो मेरे भाअी । राम बीना कुछ जानत नाही
अंतर राम बाहीर राम । जहं देखौं तहं राम ही राम
जागत राम सोवत राम । सपनें में देखौं राजा राम
अेका जनार्दनी भाव ही नीका । ज़ो देखौं सो राम सरीखा

२६२

वेणु-नादा चीया कीळा । पा’ना फुटला नीराळा
आरतभूत जीव ती’नी । चातक नीवाले जीवनीं
स्वानुभवा चे सरीते । जेवीं जीवना दाटे भरतें
अेका अेक गरजे घनीं । पूर आला जनारदनी

२६३

ओहं कोहं सोहं सरव आटलें । दृशय दरषटृतव सरव फीटलें
अैसी कृपे ची साअुली । माझी जनारदन माअुली
दवैत-अदवैता चें ज़ालें । अुगवीलें कृपा-बळें
शरण अेका जनारदनी । अेकपणें भरला अवनी

## अधयाय ३६

२६४

चीतत चतनया पडली गांठी । न सुटे मीठी
संचीत करमा ची झाली आटी । अुफराटी दृषटी
कैचा आठव दृशया चा थुंटली वाचा । अुदय झाला मुथा चा
देह वीदेह वाढले मी तूं पणें । अेका जनारदनी सहज़ अेक पणें

२६५

ज़ाणती हे कळा हारपोनी गेली । वृतती मावळली तया माजीं
पाहतां पाहणें हारपोनी गेलें । मी माझें सरलें तया माजीं
अंतरीं बाहेरीं पाहतां शेज़ारीं । शूनया ची वोवरी ग्रासीयेली
ग्रासीयेले तेणें चंद्र सूरय दो’नी । अेका जनारदनी आनंद झाला

२६६

सत्त्व रज तम गेले नीरसोनी । दृश्या ची लावणी कैशी झाली
गेलीया माघारीं पाहतां न दीसे । स्वतां तो प्रकाशे सदोदीत
अंतरीं बाहेरीं पाहतां शेज़ारीं । प्रकाश अंतरीं लखलख
अेका जनार्दनी प्रकाश संपूर्ण । सर्व नारायण बींबलासे

२६७

त्रीभुवनीं च्या दीप प्रकाश देखीला । हृदयस्थ पाहीला जनार्दन
दीपा ची ती वाती वाती च्या प्रकाश । कळीकामय दीप देहीं दीसे
चीन्मय प्रकाश स्वयं आत्म-ज्योती । अेका जनार्दनी भ्रांती नीरसली

२६८

काना वाटे मी नयना सी आलों । शेखीं नयना च्या नयन मी झालें
दृष्टी द्वारा मी पाहें सृष्टी । सृष्टी हरपली माझे पोटीं
असें जनार्दनें मज़ केलें । माझें चीत्ता च्यें जीवपण नेलें
अेका जनार्दनी ज़ाणोनी भोळा । माझा सर्वांग झाला डोळा

२६९

अुपाधी चा नांव घातीयेलें शून्य । आणीका दैन्यवाणें काय बोलूं
टाकूनीयां संग धरीयेला देव । आतां तो अुपाय दुज़ा नाही
सरव वैभव सत्ता ज़या च्ये पदरीं । झालों अधीकारी आम्ही बळें
अेका जनार्दनी तोडीयेला संग । झालों आम्ही नी:संग हरी-भजनें

२७०

माझें मीपण देहीं च मुरालें । प्रत्यक्ष देखीलें पर-ब्रह्म
पर-ब्रह्म सुखा चा सोहळा । पाहीलासे डोळा भरूनीयां
ब्रह्म-द्न्याना ची ते अुघडली पेटी । झालों असें पोटीं शीतल जाणा
अेका जनार्दनी द्न्याना चें तें द्न्यान । अुघड समाधान झालें जीवा

२७१

मन रामीं रंगलें अवघें मन ची राम झालें
सबाह्य अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें
चीत्त ची हारपलें अवघें चैतन्य ची झालें
देखतां देखतां अवघें वीश्व मावळलें
पाहतां पाहतां अवघें सर्वस्व टकलें
आत्मया रामा चें ध्यान लागलें मज़ कैसें
क्रीया कर्म धर्म अवघें येणें ची प्रकाशे
सत्य मीथ्या प्रकृती पर राम ची अवघा भासे
भक्ता अथवा द्न्यान शांती आणीक योग-स्थीती
नीर्धारीतां न कळे राम-स्वरूपीं ज़डली प्रीती
अेका जनार्दनी अवघा राम ची आदी अंतीं

## अध्याय ३७

२७२

देव जन देव वीजन । देवीं ज़डलें तन मन
देव घरीं देव दारीं । देव दीसे व्यवहारीं
देव मागें देव पुढें । दृष्टी चैतन्य अुघडें
अेका जनार्दनी देव । सहज़ चैतन्य स्वयमेव

२७३

पाहों गेलों देवा लागीं । देवरूप झालों अंगीं
आतां मी-तूंपणा ठाव । अुरला नाहीं अवघा देव
सुवर्णा चीं झालीं लेणीं । देव झाला जगपणीं
घटी मृत्तीका वर्तत । जगीं देव तैसा व्यापृत
अेकानेक जनार्दन । अेका ज़डला अेक पणें

२७४

देव झाला पाठी पोटीं । तयां नाही आटाआटी
जेथें ज़ाय तेथें देव । नाहीं भेव सर्वथा
संसारा सी मारुनी लाथा । केला तत्तवतां देशोधडी
वीषयां च्ने ठेचीलें ताडें । मोडीलें बंड पांच्नां च्ने
जनार्दना च्ना अेका म्हणे । देवा पाहणें पाठीं पोटीं

२७५

अष्ट ही दीशा पूर्ण भरला देव । मा पूर्व पश्चीम भाव तेथें कैंच्ना
पाहे तीकडे देव व्यापुनी भरला । रीता ठाव अुरला कोंठ नाहीं
समाधी समाधान मना च्नें अुन्मन । मा देवा भीन्नपण नाहीं नाहीं
अेका जनार्दनी अेकपणा साठीं । देव पाठी पोटीं भक्ता मागे

२७६

साकर दीसे परी गोडी न दीसे । ती काय ता वेगळी असे
तैसा जनीं आहे जनार्दन । तयातें पहावया सांडीं अभीमान

कापुरा अंगीं परीमळु गाढा । पाहतां अुघडा केवीं दीसे
पाठ पोट ज़ैसें नाहीं च सुवरणा । अेका जनारदनीं या परी ज़ाणा

२७७

मागें पुढें वीठ्ठल भरला । रीता ठाव नाहीं अुरला
जीकडे पहावें तीकडे आहे । दीशा-द्रुम भरला पाहे
अेका जनारदनी सरव देशीं । वीठ्ठल व्यापक नीश्चयें सीं

२७८

पहा कैसा देवा चा नवलाव । पाहे तीकडे अवघा देव
पाहणें पातलें देवें नवल केलें । सरव ही व्यापीलें काय पाहों
पाहणेया चा ठाव समूळ फीटला । अवघा देहीं दाटला देव माझा
अेका जनारदनी कैसें नवल झालें । दीशा-द्रुम दाटले देहें सहजीं

२७९

देवा सी कांहीं नेसणें नसें । जेथें तेथें देव अुघडा ची दीसे
देव नीलाज़रा देव नीलाज़रा । देव नीलाज़रा पहा तुम्ही
लाजे सी जथे नाहीं ठाव । पांढरा डुकर झाला देव
अेका जनारदनी अेकला काज । भकती तेणें ची नेली लाज़

२८०

अेक धरलीया भाव । आपण ची होय देव
नको आणीक सायास । ज़ाय तीकडे देव भास
ध्यानीं मनीं शयनीं । देव पाहे जनीं वनीं
अवलोकी जोकड । अेका जनारदना देव तीकडे

२८१

मज़ कूं दीली नाहीं सेवा । दावीलें देवा देही च
जग-व्यापक जनार्दन । सदा वसे परीपूर्ण
भीन्न भीन्न नाहीं मनीं । भरलासे जनीं वनीं
अेका जनार्दनी शरण । सर्वा ठाओं व्यापक ज़ाण

## अध्याय ३८

२८२

पाहलें रे मना पाहलें रे । बुद्धी-बोधें औंद्रीयां सम ज़ालें रे
नयनीं पाहतां न दीसे बींब । अवघा प्रकाश स्वयंभ
अेका जनार्दनी पहाट । जनीं वनीं अवनी लखलखाट

२८३

जळ स्पर्शो ज़ातां स्नानीं । तंव चीन्मात्र भासे जीवनीं
कैसी वाहताहे गंगा । स्नानें हरपलें अंग
अंगत्व मुकलें अंगा । स्नानीं सोवळी झाली गंगा
अेका जनार्दनी मज्जन । सकळ तीर्थें झालीं पावन

२८४

स्वयं प्रकाशा माजीं केलें असे स्नान । द्वैतार्थ त्यागून नीर्मळ झालों
सुवीद्ये चें वस्त्र गुंडोनी बैसलों । भूत-दया लालों वीभूती अंगीं
चोवीसां परतें अेक ओळखीलें । त चीं अुच्चारीलें मूळारंभीं
अेका भावें नमन भूतां अेकपणीं । अेका जनार्दनी संध्या झाली

२८५

झाली संध्या संदेह माझा गेला । आत्मा-राम हृदयीं प्रगटला
गुरु-कृपा नीर्मळ भागीरथी । शांती क्षमा यमुना सरस्वती
अैसीं पदें अेकत्र जेथें होती । स्वानुभव स्नान हे मुक्त-स्थीती
सद्बुद्धी चें घालूनी शुद्धासन । वरी गुरु ची दया परीपूर्ण
शम-दम वीभूती चर्चुनी जाण । वाचे अुच्चारीं केशव नारायण
सहज कर्में झालीं तीं ब्रह्मार्पण । जन नोहे अवघा हा जनार्दन
आअीकतां नीवती साधुजन । अेका जनार्दनी बाणली नीज-खूण

२८६

बोध-भानु तया नाहीं मध्याह्न । सायं-प्रातर् नाहीं तेथें कैंचा अस्तमान
कर्म ची खुंटलें करणें ची हारपलें । अस्तमान गेलें अस्तमाना
जीकडे पाहे तीकडे अुदयो ची दीसे । पूर्व पश्चीम तेथें कैंची भासे
अेका जनार्दनी नीत्य प्रकाशा । कर्माकर्म झालें दीवसां चंद्र जैसा

२८७

कृष्ण-चंदन आणीलें । सकळ वेधीलें परीमळें
तेणें फुटती अंकुर । अंगीं भावा चे तरुवर
खैर धामोडे चंदन । कृष्ण-वेधें वेधीलें मन
अेकाअेक हरीख मनीं । वसंत दाटे जनार्दनी

२८८

आतां कैसेनीं पूजूं देवा । माझी मज घडे सेवा
तोडूं गेलों तुळशी-पान । तेथें पाहतां मधु-सूदन
अत्र गंध धूप दीप । तें ही माझें ची स्वरूप
अेका जनार्दनी पूजा । पूज्य पूजक नाहीं दुजा

२८९

मी च देवो मी च भक्त । पूजा अुपचार मी समस्त
ही च अुपासना भक्ती । धर्म अर्थ सर्व पुरती
मी च गंध मी च अक्षता । मी च वाहें मी च पुरता
मी च धूप मी च दीप । मी च माझें देव स्वरूप
मी च माझी करीं पूजा । अेका जनार्दनी नाहीं दुज़ा

## अध्याय ३९

२९०

मी तों स्वयें पर-ब्रह्म । मी ची स्वय आत्मा-राम
मी तों असें नीरुपाधी । मज़ नाहीं आधी-व्याधी
मी तों अेकट अेकला । द्वैत-भाव मावळला
मज़ वीण नाहीं कोणी । अेका शरण जनार्दनी

२९१

घर सोडोनी ज़ावें परदेशा । मज़ सर्वे देव सरीसा
कडे कपाटें सीवरी । जीकडे पाहे तीकडे हरी
आतां कोणी कडे ज़ावें । जीकडे पाहे तीकडे देव
अेका बैसला नीरंजनीं । न जाअीजे जनीं वनीं

२९२

जीकडे ज़ावें तीकडे देव ची सांगातें । अैसें केलें नाथें पंढरी चा
शब्द झाला तेंथ समूळ ची वाव । गेला देह-भाव हारपोनी

अंतरीं बाहेरीं अेकमय झालें । अवघें कोंदाटलें परब्रह्म
अेका जनार्दनीं अैसी झाली वृत्ती । वृत्ती ची नीवृत्ती चीदानंदीं

## २९३

येणें-ज़ाणें थुंटलें क्रीया-कर्म ठेलें । मज़ माझें भेटलें आत्मरूप
त्यागूं तें काय भोगूं तें काय । सर्व ब्रह्मरूप पाहें कोंदाटलें
क्रीया कर्म धर्म नीखिल पर-ब्रह्म । त्यागूं भोगूं तेथें केवळ भ्रम
अेका जनार्दनीं सहजीं सहज अेक । अेकीं अेक पाहतां कैचें अनेक

## २९४

नीर मंथूनी मंथन पैं केलें । सार असार तें चवी स आलें
ताक तें ही गोड दूध ते ही गोड । रसने चीं चाड पारुषली
अेका जनार्दनीं अवघें ची सार । मानस मंथूनी पावलों पार

## २९५

सकळ गोडीये ज़ें गोड आहे । तें रसना ची झाली स्वयें
आतां चाखावें तें काय । जीह्वा अमृता वाकुली वाये
तया गोडपणा चा लोभा । कैशा सर्वांगीं नीघती जीभा
अेका जनार्दनीं गोडी । तया क्षण अेक रसना न सोडी

## २९६

तळीं हारपली धरा । वरी ठावो नाहीं अंबरा
असा सहजीं सहज नीज़े । अेका अेकपणें वीण शेज़े
दीवस नीशी हारपलीं दोन्ही । अेका नीजीजे जनार्दनीं

२९७

देह ज़ाअील तरी ज़ावो राहील तरी राहो
दोरा चीया सर्पा जीणें मरणें ना वावो
आम्ही जीतां ची मेलों जीतां ची मेलों
मरोनीयां झालों जीवें वीण
मृग-जळा चें जळ भरलें असतां नाहीं
आटलीया तेथें कोरडें होअील काअी ?
अेका जनार्दनी जग ची जनार्दन
जीणें मरणें तेथें सहज चैतन्य-घन

२९८

पाणीया चा मासा झाला । नाम-रूपा नाहीं आला
ज़ंव पारधी घाली ज़ाळें । तंव ता चें च तोंड काळें
अेका जनार्दनी सर्व ही पाणी । माशीया ची कैची खाणी

२९९

हरीखा ची गुढी बोधावा आला
अहंकार गर्ज़तु अवीवेक मारीला
संतोष वीवेक आप आपणेया वीसरला
लाज़ुनी महाहर्ष आनंदा सी गेला
मारवीला क्रोध ममता सती नीघाली
तुटला मत्सर शांती सुखें सुखावली
अेका जनार्दनी पाहतां सहजीं पैं सहजें
स्व-राज्य सांग तेथें नाहीं पैं दुज़ें

अनुक्रम ९.८.८८
विभाग ९१:८४८३
क्रमांक ७२८९
नों. दि. २७।५।५५

## अध्याय ४०

जयदेव जयदेव जय जनार्दना
परमार्थें आरती, भावार्थें आरती, अभीन्न भावनी ॥ धृ० ॥

अवलोकीतां जन दीसे जनार्दन । भीन्न भीन्न तेथें दावी अ-भीन्न
अनेक अेकत्वें दीसे परीपूरण । ठकली बुद्धी कैचा गुण अवगुण

ज्योती चीया ज्योती अुजळूनी दीपती । तेणें तेजें केली सतेज आरती
पाहतां पाहतेपण पहावया स्थीती । नुरे ची वेगळेपण देहभाव-स्फुरती

पाठ ना पोट अवघा नीघोट । सर्वांगीं देखणा सर्वा वरीष्ठ
अीष्ट नाऽनीष्ट गुप्त ना प्रगट । ओहं सोहं सगट भरीयेला घोट

सर्वदा दीसे परी नाकळे मना । जें जें दीसे तें तें दर्शन ज़ाणा
अभावने सीं गीळीली भावना । अभीनव आरती अेका जनार्दना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
वा. क्र. ८८८९
(स्थल प्रत)

## अेकनाथाचीं भजनें

# भजनांची सूची

[ अंक भजनांचे आहेत ]


| भजन | अंक | भजन | अंक |
|---|---|---|---|
| अधर्में अदृष्टा चें | १० | आजीं देखीलीं | २१२ |
| अनुतापा वांचूनी | ७१ | आजीं नवल | १२२ |
| अबद्ध पढतां | ८५ | आजीं सुदीन | १५२ |
| अभक्तां देव | १३२ | आतां कैसेनी | २८८ |
| अभाग्य न भजती | २१९ | आधीं घेअी | १५ |
| अभीनव गुर नें | २५७ | आधीं देव पाटीं | २२५ |
| अभीनव सांगतां | २५८ | आनंद अद्वय | २०५ |
| अभेद-भजना च्या | २३५ | आनंदा च्या भोग | १९२ |
| अभेदा वांचून | २१८ | आपुली च दारा | १४७ |
| अर्थ नाहीं ज़या | ४२ | आपुली पूजा | ३२ |
| अवघा व्यापक | २०९ | आपुलें कल्याण | ८९ |
| अवघें ची त्रलोक्य | २०३ | आत्मां सी तों पुरे | १९७ |
| अवीश्वासा घरीं | ४८ | आत्मी अलक्षपुर | ६९ |
| अवीश्वासा पुढें | ४९ | आत्मी ब्रह्मपुरी चे | ६३ |
| अशाश्वता साटीं | ३ | आंबे केळीं द्राक्ष | ७७ |
| अष्ट ही दीशा | २७५ | आंबेया पाडू लागला | ७४ |
| असत्या च्या शब्द | ४१ | आरशा अंगीं लागतां | ३८ |
| असंख्य वचनें | ९४ | आवडी करीतां | ११४ |
| असोनी संसारीं | १४४ | आवडी नें भावें | ११३ |
| आजीं च्या सुदीनु | २०७ | आशा-बद्ध करीती | १६ |

| | |
|---|---|
| अीच्छा केली तें | २१३ |
| अुत्तम पुरुषा चें | २२ |
| अुदार धीर-नीधी | ७६ |
| अुपाधी चा नांवें | २६९ |
| अेक धरलीया | २८० |
| अेक नरदेह | ५० |
| अेका घरीं द्वार-पाळ | २३१ |
| अेका देहा माजीं | २४५ |
| अैकें अुद्धवा | २४३ |
| अैसे जे धाले | १५६ |
| ओखद घेतलीया | ८८ |
| ओहं कोहं सोहं | २६३ |
| ओळखीला हरी | १०९ |
| कअीं तया मार्गें | १९१ |
| कनक कांता न ये | ४५ |
| करीतां कीर्तन-श्रवण | ११८ |
| करीतां हरीकथा-श्रवण | ३७ |
| कर्म करीसी | १८ |
| कलत्र पुत्र बाधा | ५२ |
| काना वाटे मी | २६८ |
| काम क्रोध लोभ | ६४ |
| काया ही पंढरी | २२२ |
| कीर्तना ची आवडी | ११५ |
| कीर्तना ची मर्यादा | १२५ |
| कृतांता चे माथां | ८३ |
| कृष्ण-चंदन | २८७ |
| कृष्णा धांव रे | १८८ |
| केला संतीं अुपकार | १६७ |
| केलें तुवां काय | २८ |
| कैवल्य-नीधान | १६५ |
| कोणी कांहीं तरी, | १०० |
| खुरपूं लागे | २३२ |
| गाअूं तरी अेक | १९९ |
| गातों अेका ध्यानों | १९८ |
| गुंतला भ्रमर | ७९ |
| गुरु-कृपांजन | २६१ |
| गुरु परमात्मा | १७२ |
| गोल्हाट अुल्हाट | १५४ |
| घर सोडोनी | २९१ |
| घालीं देवा वरी | ९८ |
| चक्षु-दर्पणीं | २४९ |
| चतुर्भुज श्याम-मूर्ती | २०८ |
| चंद्रा हूनी शीतळ | २०४ |
| चरण वंदीती | १८३ |
| चरणां ची थोरी | १८२ |
| चरणा ची सेवा | २०१ |

चीत्त चैतन्या २६४
चींतनें नासतसे ९७
चींतातुर मन ९६
छळीतां न येती १४६
जगदात्मा श्रीहरी २०२
जग राम-नाम १०१
जगा चीये नेत्रीं २१
जगा चें जीवन २०६
जनार्दनें मज़ केला २५५
जनार्दनें मज़ सांगीतला ९३
जन्म-मरणा चें तुटलें २१०
जन्मोजन्मीं चें संचीत १७७
जय गोवींदा १९६
जय जय वो १७८
जय देव जय देव ३००
ज़या करणें आत्महीत ११
ज़या चेनी चरणें १३८
ज़या ज़ैसा हेत १३५
जळ स्परशों २८३
जागा परी नीज़ला २५२
जागृती स्वप्नीं ९५
ज़ाणती हे कळा २६५
जीकडे ज़ावें २९२
जीवा चें जीवन ३१
ज़ें ज़ें दीसे तें तें २
जें जें दृष्टी ११०
ज़ें ज़ें बोले तैसा चाले १४३
जेथें जेथें मन १९४
ज़ें पदीं नीरूपण १२३
ज़ो वस्तु झाला १५०
जो सी करणें चीत्त १२
झाली संध्या २८५
तळीं हारपली धरा २९६
तुझ सगुण ज़री १८६
तुमचे अप्रमाण २३८
तुमचें नाम-संकीर्तन २००
तुमचे वर्णीतां ११९
तुम्ही कृपाळु २३३
तुम्ही संत-जन १६३
तें मन नीष्ठुर १८९
तोंडीं घास डोळां १०३
त्रीभुवनीं चा दीप २६७
थोर तो ची म्हणावा ६२
दारची गोंधण ७५
दासा दुःख झालें १७६
दृष्टी देखे २५३

देव जन देव — २७२
देव झाला पाटी — २७४
देव दगडा चा — २५
देव देव ’मणोनी — ३०
देव धावे मागें — २३०
देव प्रसन्न झाला — २२०
देव ’मणे भक्तां — २३६
देवा मी कांहीं — २७९
देवा सी तों प्रीय — ८४
देवो वीसरे — २३४
देह ज़ाईल — २९७
देह-बुद्धी सांडी — ६०
देह मांडावा ना — ७
देह हा काळा चा — ४
देहीं असोनी — १४९
देहीं वाढे ज़ों ज़ों — ७२
धन्य तो ची — १२७
धन्य दीवस — १६६
धर्मा चीं वाट — १४२
धावूं नको सैरा — १९
नर-देहीं येउनी — ६
नवल भजना चा — १२१
नवल रोग-पडीपाडू — ११६
नववीधा भक्ती — २२३
न’वतां शुद्ध — १५३
नाम घेतां हे — १०२
नाहीं ज़या भाव — ९०
नीत्य नवा — १२४
नीत्य-नैमीत्तीक — १३
नीरपेक्ष नीर्द्वंद्व — २५१
नीवांत श्रीमुख — १८५
नीवृत्ती शोभे — १४१
नीचा चेनी स्पर्शें — २६
नीर मंथूनी — २९४
पक्षी अंगणीं — ४७
परब्रह्म-पराप्ती — १४
परमार्था चे वचना — ८
पशु आणी पक्षी — ९९
पहा कैसा देवा — २७८
पाणीया चा मासा — २९८
पाहलें रे मना — २८२
पाहों गेलों देवा — २७३
पींपळा वरुनी — ३४
पीक पीकलें — २९९
प्रतीमा ची देवो — २७
प्रतीमे चा दव — २४

| | | | |
|---|---|---|---|
| प्रपंच परमार्थ | २० | मज़ कोणीं न | १४५ |
| फूल झडे तंव | १ | मज़ जे अनुसरले | २३९ |
| बहुतां चीं मतांतरें | १८४ | मत्सर दन्यानीया तें | ५६ |
| बहु बोला चें | २३७ | मन रामीं रंगलें | २७१ |
| बैसतां नीश्चळ | ६५ | मनोभाव ज़ाणोनी | १७० |
| बोध-भानु तया | २८६ | ममता ठेवुनी | ५४ |
| ब्रह्म अेक परीपूर्ण | ५९ | मागणें तें आ'मी | १२० |
| ब्रह्म-स्थीती चें | २५४ | मागणें हें ची | १९३ |
| ब्रह्म सर्व-गत | १५१ | मागें पुढें वीठ्ठल | २७७ |
| ब्रह्मांडा ची | ४० | मागें बहुतां सी | ५ |
| भक्तपणा सान | २२६ | माझा शरणागत | २४१ |
| भक्ता लागीं | २२७ | माझा मना चें तें | ६८ |
| भक्ती-प्रेमा वीण | २१६ | माझें मीपण | २७० |
| भक्ती चे अुदरीं | २१५ | मीठी घालुनीयां | २२८ |
| भक्ती चा पोटीं | २१७ | मी अेक शुची जग | ५३ |
| भगवद्भावो सर्वां | २१४ | मी च देवो मी च | २८९ |
| भजन नाहीं | १९० | मी तूं अैसी परी | २४८ |
| भजन भावा तें | २२४ | मी तों स्वयें | २९० |
| भव-रोगा सी | १०४ | मी वासुदेव-नामें | २२१ |
| भुक्ती आणी मुक्ती | २६० | मुखीं नाहीं नींदा | १४८ |
| भुक्ती-मुक्ती | ८० | मेघ वर्षे | ९ |
| मज सी जेणें | २४० | मेघा परीस | १३४ |
| मज़ कूं दीली | २८१ | मोकळें तें मन | १६८ |

मोह ममता ही ५५
येणें-ज़ाणें थुंटलें २९३
येवढें ज़या कृपे चें १७४
रस सेवीली साठीं ४६
राम कृष्ण हरी ८२
राम हें माझें १८७
लज्जा अभीमान ५७
लोखंडा ची बेडी ५१
लोह परीसा सी ९२
लौकीका पुरता ७८
वर्म ज़ाणे तो २५०
वीठ्ठल म्हणतां ९१
वीवाद-वाद हें ५८
वीश्व पाळीताहे १८१
वीषया चे अभीलाषे ४३
वेणु-नादा चीया २६२
वेद ज़या लागीं १०८
वेद-युक्त मंत्र १७
वेद-वाणी देवें ३५
वेदां माजीं ओंकार ३३
वैर करूनी मन ६७
वैष्णवां घरीं १२८
व्यापक वीठ्ठल १०६
शत्रु वसती ६६
शतावर्ती ३६
श्री गुरू चें नाम १७१
श्रुती सांगती ३९
सकळ गोडीये २९५
सगुण गुण-माया २४४
सगुण चरीत्रें १२६
सत्त्व रज २६६
सत्पद तें १११
संत आधीं देव १३०
संत केवळ घातकी १३९
संत ज़ाती हरी-कीर्तना १६१
संत-द्वारीं कुतरा १६९
संत भलते याती १६२
संत माय-बाप १३७
संत-संगती नें १६४
संता-अंकीं देव १२९
संतां चा महीमा १३१
संतां चीये घरीं १५९
संतां चीये द्वारीं १५८
संतां चीये परीवारीं १६०
संतां चे ठाईं १३६
संता वांचोनीयां १५७

| | |
|---|---|
| संता सी आवडे | १५५ |
| संता सी ज़ो नींदी | १३३ |
| समुद्र क्षोभे | २३ |
| सर्व कर्म | २४२ |
| सर्व भावें दास | २५६ |
| सर्व भावें सुख | ७० |
| सर्वांगीं सुवास | १४० |
| सर्वां भूतीं देव | ६१ |
| सर्वा भूतीं तुझें | १९५ |
| सर्वां मार्जीं सार | ८६ |
| सहज सहज अैशा | २४७ |
| साकर दीसे परी | २७६ |
| साचपणें देवा शरण | २२९ |
| सात्वीका भरणें | २४६ |
| साधका सर्वदा | ७३ |
| साधावया परमार्था | १७५ |
| सायासा चें बळ | २११ |
| सुंदर तें ध्यान | १७९ |
| सेवे ची आवडी | १७३ |
| सेवे चें कारण, | ८१ |
| संसार-सागरीं बुडालीया | ८७ |
| स्वयं प्रकाशा | २८४ |
| हरी-कीर्तनें | ११७ |
| हरीथा ची गुढी | २९९ |
| हरीनाम स्मरतों | १०५ |
| हरी बोला देतां | ११२ |
| हरी हरी बोला | १०८ |
| हरी चीया दासा | १०७ |
| हीं ची दो'नी पैं | ४४ |
| हृदयस्थ असोनी | २९ |


REFBK-0007475

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# शुद्धी-पत्र

[ कृपया पुढील प्रमाणे शुद्ध करून घ्या ]

| पृष्ठ | भजन | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | ३१ | जीवा | जीवा |
| १० | ३७ | नये | न ये |
| १३ | ४६ | कोटी | कोटी |
| २० | ७१ | नये | न ये |
| २२ | ७७ | कडु | कडू |
| ३१ | १११ | पैलवस्तू | पैल वस्तू |
| ३३ | ११९ | छंदी सी | छंदीसी |
| ३३ | ११९ | दृष्टी | दृष्टी |
| ३७ | १२९ | बसे | वसे |
| ५६ | १९० | समावला | सामावला |
| ६१ | २०५ | मा:झीया | माझीया |
| ६८ | २२७ | ने साहव | न साहवे |
| ६९ | २३२ | सज्:जन | स:जन |
| ७१ | २३७ | सह:ज | सहज |
| ७८ | २६१ | क:छ | कछु |
| ७८ | २६१ | सपने | सपने |
| ७९ | २६४ | मुथा | सुथा |
| ८१ | २७२ | सह:ज | सहज |
| ८२ | २७४ | ताडें | तोंड |
| ८३ | २७८ | मा:झे | माझे |
| ८३ | २७९ | नसे | नसे |
| ८३ | २८० | जोकड | जीकडे |
| ८४ | २८२ | अको | अेका |
| ८४ | २८३ | अगंत्व | अंगत्व |